रौप्य महोत्सवी
वर्ष २०१८

// स्त्रीशक्तिरतुल्या सदा //

वर्ष : १ अंक : ३

# साद

मार्च २०१८



# सुहिता

तुमच्यासाठी
## आयोगाचा मदतीचा हात

## ७४७७७२२४२४

महाराष्ट्र राज्य महिला आयोग

रौप्य महोत्सवी
वर्ष २०१८

// स्त्रीशक्तिरतुल्या सदा //

# महाराष्ट्र राज्य महिला आयोग, मुंबई

अध्यक्षा



**विजया रहाटकर**

सदस्य



**नीता राजेंद्र ठाकरे**

सदस्य



**गयाताई शिवाजीराव कराड**

सदस्य



**देवयानी ठाकरे**

सदस्य



**विंदा कीर्तीकर**

सदस्य



**ॲड. आशा लांडगे**

पदसिद्ध सदस्य



**सतीश माथूर**
पोलीस महासंचालक

सदस्य सचिव



**डॉ. मंजूषा सुभाष मोळवणे**

// स्त्रीशक्तिरतुल्या सदा //

# साद

**मुख्य संपादक**
विजया रहाटकर

**कार्यकारी संपादक**
डॉ. मंजूषा मोळवणे

**सहायक संपादक**
कपालिनी सिनकर

**प्रकाशक**
महाराष्ट्र राज्य महिला आयोग
पोटमाळा, गृहनिर्माण भवन
कलानगर, वांद्रे (पूर्व), मुंबई–५१
फोन : ०२२–२६५९०८७८

**मुद्रक**
आशुतोष प्रेस, ए२/२६४,
शाह आणि नहार औद्योगिक वसाहत,
एस. जे. मार्ग, लोअर परळ, मुंबई–१३

**वाचक संपर्क :**
saad.mscw@gmail.com

**आयोगाशी संपर्क :**
mscwmahilaayog@gmail.com
www.mscw.org.in
www.vijayarahatkar.co.in
Maharashtra Rajya Mahila Ayog (@mahascw)
@vijaya.rahatkar
@VijayaRahatkar
Tejaswini App

**'सुहिता' हेल्पलाइन**
**७४७७७२२४२४**

**स्वागत मूल्य : ₹ १०**
**वार्षिक स्वागत मूल्य : ₹ १००**

# संपादकीय

## सोहळा स्त्रीत्वाचा



जागतिक महिला दिन आठ मार्च रोजी उत्साहात पार पडला. ठिकठिकाणी अनेक कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. राज्य सरकार आणि महाराष्ट्र राज्य महिला आयोगानेही या निमित्त ठिकठिकाणी विविध उपक्रमांचे आयोजन केले होते. महिलांसाठी पाच रुपयांत आठ सॅनिटरी पॅड पुरविण्याच्या अस्मिता योजनेचा प्रारंभ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते महिला दिनी करण्यात आला. ज्या गोष्टीचा उल्लेख अद्यापही 'विटाळ' असा केला जातो, ज्यासाठी अजूनही स्त्रियांना चार दिवस शिवाशिव पाळावी लागते, त्या मासिक पाळीविषयी महिलांमध्ये अद्याप बरेच प्रबोधन होणे आवश्यक आहे. अस्मिता योजना ही त्या दृष्टीने एक पुढचे पाऊल म्हणावे लागेल.

त्या दिवशीच राष्ट्रीय राजधानी नवी दिल्लीत सिंधुताई सपकाळ आणि उर्मिला आपटे यांच्यासह नऊ महिलांचा राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांच्या हस्ते नारीशक्ती पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला. महाराष्ट्र राज्य महिला आयोगानेही सुहिता ही हेल्पलाइन महिलांसाठी सुरू केली आहे. महिलांना समुपदेशन करण्याच्या हेतूने ती सुरू करण्यात आली असून, गरजू महिलांना आपल्या समस्यांतून मार्ग शोधण्यासाठी मदत होईल, अशी आशा वाटते. महिलांसाठी हे आणि असे अनेक प्रयत्न वेगवेगळ्या पातळ्यांवर सुरू असले, तरी अजून बराच लांबचा पल्ला गाठायचा आहे. अमेरिकेत १९०९ साली आठ मार्च रोजी सोशलिस्ट पार्टी ऑफ अमेरिका या पक्षाने प्रथम राष्ट्रीय महिला दिन साजरा केला. हेच महिला दिनाच्या संकल्पनेचे मूळ मानले जाते. त्यापुढील महिलांचे अधिवेशन १९१० मध्ये डेन्मार्कमधील कोपनहेगन येथे भरविण्यात आले. त्याला जगभरातील अनेक देशांतील महिला उपस्थित होत्या. त्या अधिवेशनात जागतिक महिला दिन साजरा करण्याचा ठराव करण्यात आला. १९११ मध्ये १९ मार्च रोजी ऑस्ट्रिया, डेन्मार्क, जर्मनी, स्वित्झर्लंड आदी देशात सुमारे दहा लाखांवर नागरिकांनी आंतरराष्ट्रीय महिला दिन साजरा केला. आठ मार्च १९१७ रोजी रशियात पेट्रोग्राड येथे कापड गिरण्यांतील महिला कामगारांनी भाकरी आणि शांती या साठी आंदोलन पुकारले. त्याचा वणवा रशियाभर पोहोचून पुढे रशियन राज्यक्रांतीची मुहूर्तमेढ रोवली गेली. तेव्हापासून सोव्हिएत महासंघात आठ मार्च हा दिवस आंतरराष्ट्रीय महिला दिन म्हणून साजरा केला जातो. पुढे १९७७ मध्ये संयुक्त राष्ट्रसंघाने एक ठराव करून आठ मार्च हा दिवस जागतिक महिला दिन म्हणून साजरा करण्याचा निर्णय घेतला.

आज जगभरात हा दिवस मोठ्या उत्साहाने साजरा केला जातो. मात्र, तो प्रतीकात्मक पद्धतीने साजरा होता कामा नये, अन्यथा तो साजरा करण्यामागील हेतूच विफल होईल. स्त्रियांचे समाजातील स्थान उंचावण्यासाठी समाज म्हणून आपण सारेच जण प्रयत्न करू या. या महिला दिनाच्या निमित्ताने प्रत्येकाने तसा संकल्प करून त्यानुसार आचरण करण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

**विजया रहाटकर**, मुख्य संपादक आणि महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा

// स्त्रीशक्तिरतुल्या सदा //

**वाचकांना निवेदन** 'साद' हे महिला आयोगाचे मुखपत्र असले तरी, येथे प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक लेखांशी आयोग सहमतच असेल, असे नाही.

# अंतरंग...


सिंधुताई, उर्मिला आपटे यांना नारीशक्ती पुरस्कार प्रदान — पान ८



आम्ही प्रथमा — पान ११

महाराष्ट्राचा अर्थसंकल्प... मार्ग प्रगतीचा, समृद्धीचा — पान २९



जीवनाचे महादान — पान ३७


// स्त्रीशक्तिरतुल्या सदा //

रौप्य महोत्सवी
वर्ष २०१८

// स्त्रीशक्तिरतुल्या सदा //

# ‘सुहिता’ तुमच्यासाठी आयोगाचा मदतीचा हात

संकटात आहात ? माहिती हवीय ?

## घाबरु नका... सहन करु नका...

संपर्क साधा ‘सुहिता’वर

## महाराष्ट्र राज्य महिला आयोगाची तुमच्यासाठी हेल्पलाइन

Helpline **७४७७७२२४२४**



**आयोगाशी संपर्क :-**

- mscwmahilaayog@gmail.com
- www.mscw.org.in
- Maharashtra Rajya Mahila Ayog (@mahascw)
- Maharashtra women commission (@mscw_bandra)
- Tejaswini App

# मौन क्रांतिकारकांची मदतनीस... ‘मुद्रा’



**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे सरकार कोणाचाही अनुनय न करता समाजातील प्रत्येक घटकाचे सक्षमीकरण करण्यासाठी (एम्पॉवरमेंट विदाउट अपीजमेंट) कटिबद्ध आहे. याला आपण सन्मानाने सक्षमीकरण असेही म्हणून शकतो. मुद्रा योजना हा या धोरणाचा सर्वोत्तम आविष्कार म्हणता येईल.**

## विजया रहाटकर
अध्यक्षा, महाराष्ट्र राज्य महिला आयोग

महिला म्हणजे एकूण लोकसंख्येचा अर्धा हिस्सा, ही आता जणू एक म्हण बनली आहे. तरीही देशविकासाच्या महान कार्यात महिलांची भूमिका आणि योगदान यांना पाठबळ देणारी पावले खचितच उचलली जातात. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारने पहिल्या दिवसापासूनच महिलांशी संबंधित पैलूंकडे लक्ष दिले. या दृष्टिकोनातून मुद्रा योजनेकडे (मायक्रो युनिट्स डेव्हलपमेंट अँड रिफायनन्स एजन्सी) पाहिल्यास तिचे यश लक्षात येऊ शकेल.

महिला सक्षमीकरणासाठी आजवर आखलेल्या योजनांमध्ये मुद्रा योजना सर्वाधिक यशस्वी ठरलेली योजना आहे. या योजनेच्या एकूण लाभार्थींपैकी ७५ टक्के महिला आहेत, हाच या दाव्याचा पुरावा आहे. या योजनेमुळे लाभार्थी फक्त स्वावलंबी बनले असे नाही, तर त्यामुळे कितीतरी अन्य लोकांनाही रोजगार मिळाला. भारतीय महिलांच्या सामर्थ्याचे हे प्रत्ययकारी उदाहरण आहे. महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी सरकार अनेक प्रयत्न करीत आहे. सरकारी आणि खासगी बँकाही त्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावत आहेत. उद्योग क्षेत्रात महिलाही हिरीरीने भाग घेत आहेत. याचा अर्थ असा की, देशातील छोट्या शहरांतील महिलाही बँक मॅनेजरपर्यंत पोहोचून आपले बिझनेस मॉडेल त्यांना पटवून देण्यात यशस्वी होत आहेत.

महिला उद्योजकांना प्रोत्साहन देण्यासाठी मुद्रा योजना कार्यरत आहे. त्यासाठी केंद्रीय अर्थमंत्री अरुण जेटली यांनी सन२०१५-१६ च्या अर्थसंकल्पात निधीरूपाने २० हजार कोटी रुपयांची आणि हमीरूपाने तीन हजार कोटी रुपयांची तरतूद केली होती. लघू उद्योजकांना पाठबळ देणे आणि त्यांना रास्त दराने कर्ज उपलब्ध करून देणे ही योजनेची उद्दिष्टे होती. नवा व्यवसाय सुरू करण्यासाठी वा व्यवसायाचा विस्तार करण्यासाठी ५० हजार रुपयांपासून ते दहा लाख रुपयांपर्यंतचे कर्ज या योजनेतून दिले जाते. कर्जदारांना एक मुद्रा कार्डही दिले जाते. गरजेच्या वेळी त्याचा उपयोग क्रेडिट कार्डसारखा करता येतो. अचानक गरज भासल्यास या कार्डद्वारे दहा हजार रुपयांची

रक्कम काढता येते.

महिला सक्षमीकरणासाठी प्रत्येक सरकार कोणती ना कोणती योजना आखत असतेच, पण त्या योजनेची अंमलबजावणी कशी होते, यावर सरकारचा हेतू आणि योजनेची परिणामकारकता दिसून येते. मुद्रा योजनेच्या बाबत बोलायचे तर ही योजना महिलांसाठी हितकर असल्याचे दिसून आले आहे. कोणत्याही तारणाविना महिलांना सहज कर्ज उपलब्ध होत आहे. कर्ज देतानाही अनुसूचित जाती, जमातीच्या महिलांना प्राधान्य दिले जात आहे. त्यामुळेच महिला सशक्तीकरणाच्या दृष्टीने ही योजना अत्यंत यशस्वी आणि लोकप्रिय ठरली. या योजनेंतर्गत देशभरात आतापर्यंत ७.८ कोटी प्रकरणे मंजूर करण्यात आली आहेत. कर्जवाटपासाठी ३.३५ लाख कोटी रुपये मंजूर करण्यात आले असून, ३.२३ लाख कोटी रुपयांचे कर्ज वाटप करण्यात आले आहे. सन २०१८-१९मध्ये या योजनेंतर्गत चार लाख कोटी रुपयांचे कर्जवाटप करण्याचे उद्दिष्ट अर्थमंत्री जेटली यांनी ठेवले आहे. एकट्या उत्तर प्रदेशातच मुद्रा योजनेंतर्गत ६८.६ लाख प्रकरणे मंजूर करण्यात आली आहेत. त्यासाठी २८ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली होती. त्यापैकी २७ हजार कोटी रुपयांचे कर्जवाटप करण्यात आले आहे. सन २०१६-१७मध्ये मुद्रा योजनेंतर्गत कर्जवाटप करण्यात आलेल्यांपेकी ७५ टक्के महिला होत्या. त्यातही वीस टक्के अनुसूचित जातींच्या आणि पाच टक्के अनुसूचित जमातींच्या होत्या. या योजनेंतर्गत कर्ज घेणाऱ्यांमध्ये ३५ टक्के लाभार्थी इतर मागासवर्गीय (ओबीसी) होते.

याचे एक उदाहरण मी स्वतः पाहिले आहे आणि त्याच आधारावर हा लेख लिहीत आहे. सरकारच्या या योजनेमुळे उत्तर प्रदेशातील बरेली जिल्ह्यातील महिलांच्या जीवनात घडून आलेला आमूलाग्र बदल मी स्वतः पाहिला आहे. भाजप महिला मोर्चाच्या वतीने नरियावल येथील जवाहर मीना इंटर कॉलेजमध्ये 'मुद्रा लोन केम्प' आयोजित करण्यात आला होता. भाजप महिला मोर्चाची राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून मी त्या मेळाव्याची प्रमुख पाहुणी होते. तेथील खासदार संतोषकुमार गंगवार आणि ओन्लाचे खासदार धर्मेंद्र कश्यप हेही उपस्थित होते. या मेळाव्यात कर्ज घेण्यासाठी आलेल्या ७० टक्के महिला मुस्लिम होत्या. त्यावरून अनुनयाचे राजकारण न करताही महिलांचे सक्षमीकरण होऊ शकते, याची प्रचिती आली.

महिला कुटुंबाचे पालन-पोषण करतात. कुटुंबातील व्यक्तींच्या आशा-आकांक्षा पूर्ण करण्यात त्यांची भूमिका मोलाची असते. आपला समाज मात्र अजूनही पितृसत्ताक आहे. देशातील अनेक भागांत अजूनही फक्त मुलांनाच शिकविण्यास प्राधान्य दिले जाते. तसेच, संपत्तीवरही त्यांचाच अधिकार असतो. अशा स्थितीत कर्ज मिळवणे महिलांसाठी सोपे नसते. वित्तसंस्था किंवा बँका कर्जदाराची परतफेडीची आर्थिक क्षमता लक्षात घेऊनच कर्जवाटप करतात. नेम क्या याच ठिकाणी मुद्रा योजना महत्त्वाची भूमिका बजावते. 'फंडिंग द अनफंडेड' म्हणजेच पैसे नसलेल्यांना ते उपलब्ध करून देणे,



हे या योजनेचे ब्रीदवाक्य आहे. या योजनेचे खरेखुरे प्रतिबिंब मला नरियावावलच्या मेळाव्यात आलेल्या मुस्लिम महिलांच्या चेहऱ्यावर दिसले. उत्तर प्रदेशात मुद्रा योजनेंतर्गत कर्ज घेणाऱ्यांपैकी ७९ टक्के महिला आहेत.

इमानदारी हे गरिबांचे सगळ्यात मोठे भांडवल आहे, असे पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले होते. मुद्रा म्हणजे भांडवलाच्या मदतीने त्यांच्या इमानदारी हीच त्यांच्या यशस्वितेची गुरुकिल्ली ठरेल. आज दोन वर्षांनंतर मुद्रा योजनेचे लेखापरीक्षण झाल्यानंतर ही बाब अगदी ठळकपणे अधोरेखित होते.

केरळच्या एर्नाकुलम जिल्ह्यातील एकमेव महिला ऑटोरिक्षा चालक उषा बाबू यांच्यापासून ते बेंगळुरूच्या सुमन यांच्यापर्यंत अनेक महिलांनी 'मुद्रा'च्या मदतीने स्वकर्तृत्वावर काही तरी करून दाखवले आहे. मेहराज बी यांनी मुद्रा योजनेंतर्गत १५ हजार रुपयांचे कर्ज घेऊन हाताने बनविलेले झाडू विक्रीचा व्यवसाय सुरू केला. आज त्यांचे उत्पन्न दीडपट झाले आहे. अशा महिला म्हणजे आपल्या समाजातील मूक क्रांतिकारक आहेत. आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी महिलांनी केलेला खर्च अधिक उत्पादक असतो. या खर्चाचा केंद्रबिंदू मुलांचे शिक्षण असते, त्यातूनच कौटुंबिक भरभराटही होते. स्त्रिया स्वावलंबी होईपर्यंत त्यांचे सक्षमीकरण होणार नाही. समाजातील सर्वांत तळागाळातील महिला सर्वांत प्रगत योजनेचा लाभ घेण्यासाठी पुढे येत आहे, यापेक्षा अधिक आनंदाची गोष्ट दुसरी काय असणार? आज समाजातील वंचित वर्गही विकासाच्या प्रक्रियेत हातभार लावण्यासाठी आणि त्याचे लाभ घेण्यासाठी पुढे येत आहे. देशाचा विकास यापेक्षा वेगळा काय असतो? महिलांना पुढे जाण्याच्या संधी मिळून त्या स्वावलंबी होत आहेत, समाजाच्या प्रगतीत त्याही हातभार लावत आहेत. महिलांच्या प्रगतीची ही अनुभूती आंतरराष्ट्रीय महिला दिनी खूप समाधानकारक आहे.

**(ब्लॉग संपर्क : vijayarahatkar.wordpress.com)**



# सिंधुताई, उर्मिला आपटे यांना नारीशक्ती पुरस्कार प्रदान

साद प्रतिनिधी

अनाथ मुलांसाठी आयुष्य वेचणाऱ्या ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या सिंधुताई सपकाळ आणि भारतीय स्त्री शक्ती या संस्थेच्या अध्यक्षा उर्मिला आपटे यांना नारीशक्ती राष्ट्रीय पुरस्कार प्रदान करण्यात आला. राष्ट्रपती भवनात पार पडलेल्या दिमाखदार सोहळ्यात राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांच्या हस्ते पुरस्काराचे वितरण करण्यात आले.

केंद्रीय महिला बालविकास मंत्रालयाच्या वतीने दिला जाणारा पुरस्कार मानाचा समजला जातो. विविध क्षेत्रात आपल्या कामाचा ठसा उमटविणाऱ्या महिलांचा नारीशक्ती राष्ट्रीय पुरस्काराने सन्मान केला जातो. यावर्षी महाराष्ट्रातील दोन कर्तृत्ववान महिलांच्या पुरस्कारार्थींच्या यादीत समावेश होता.

अनाथांची आई डॉ. सिंधुताई सपकाळ आणि 'भारतीय स्त्री शक्ती' या संस्थेच्या अध्यक्षा उर्मिला बळवंत आपटे यांचा पुरस्कारविजेत्यांत समावेश होता. केंद्रीय महिला व बालकल्याण मंत्रालयाच्यावतीने जागतिक महिला दिनी राष्ट्रपतींच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. दर वर्षी महिला दिनी हा राष्ट्रीय 'नारीशक्ती पुरस्कार दिला जातो. वर्ष २०१७ च्या पुरस्कारासाठी देशभरातील अनेक महिलांसह महाराष्ट्रातील दोन महिलांचा सन्मान करण्यात आला. पुरस्कार विजेत्यांमध्ये ३० महिला आणि नऊ संस्थांचा समावेश आहे.

स्त्री आणि पुरुषांमध्ये भेद करणे हा समाजाच्या मानसिकतेतील मोठा दोष आहे. देशाचा सवर्गीण विकास साधण्यासाठी हा भेद नष्ट करणे आवश्यक आहे. हा भेद दूर करण्याची जबाबदारी देशातील प्रत्येक नागरिकाची आहे. आपण आपल्या मुलींना समजून घेतले पाहिजे आणि आष्यात प्रगती साधण्याच्या सर्व संधी त्यांना उपलब्ध करून दिल्या पाहिजेत. मुलींना समान अधिकार नाकारणाऱ्या प्रथा, परंपरांचा त्याग आपल्याला करावा लागेल. लिंगविषमता दूर करण्यासाठी प्रबोधन आणि शिक्षण हीच प्रभावी साधने आहेत. शिक्षणामुळे समाजातील भेदाभेद दूर करण्याची जाणीव आणि सामर्थ्य प्राप्त होते, असे राष्ट्रपती रामनाथ कोविंद म्हणाले.

महिलांच्या सक्षमीकरणासाठी महिला आणि बालकल्याण मंत्रालय अविरत प्रयत्नशील आहे, अशी ग्वाही केंद्रीय महिला आणि बाल कल्याण मंत्री मनेका गांधी यांनी या वेळी दिली. महिलांच्या सुरक्षेला सरकारचे सर्वोच्च प्राधान्य आहे. महिलांना सार्वजनिक ठिकाणी, कामाची ठिकाणे, घरे आणि ऑनलाइनही सुरक्षितता मिळावी, यासाठी सरकार प्रयत्नशील आहे. महिलांना हिंसेविरोधात दाद मागता यावी, यासाठी २०० वन स्टॉप सेंटर, एक खिडकी सुरू करण्यात आल्या आहेत. त्याचा लाभ आतापर्यंत एक लाख महिलांना झाला आहे.



## डॉ. सिंधुताई सपकाळ यांचा जीवनपट

अनाथांची आई म्हणून व्रत स्वीकारलेल्या ज्येष्ठ समाज सेविका सिंधुताई सपकाळ यांनी अतिशय प्रतिकुल परिस्थितीत आपलं आयुष्य व्यतीत करून शेकडो अनाथांना आईची माया दिली. त्यांच्या या संघर्षाची दखल घेत त्यांना यापूर्वी अनेक पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आलेले आहे. सिंधुताई सपकाळ उपाख्य माई म्हणूनच त्या सर्व परिचित आहेत. सिंधुताईंचा जन्म हा वर्धा जिल्ह्यातील नवरगाव येथील आहे.

## उर्मिला आपटे यांचा जीवनपट

उर्मिला बळवंत आपटे या मुंबई येथील ‘भारतीय स्त्री शक्ती’ स्वयंसेवी संस्थेच्या अध्यक्षा आहेत. उर्मिला आपटे यांना त्यांच्या संस्थेने महिलांच्या सर्वांगिण विकासासाठी केलेल्या कामाच्या योगदानबद्दल त्यांना हा पुरस्कार जाहीर झाला आहे. भारतीय स्त्री शक्ती ही स्वयंसेवी संस्था महिलांचे शिक्षण आणि कौशल्य विकास, मानसिक आणि शारीरिक आरोग्य, स्वाभिमान, आर्थिक स्वातंत्र्य तसेच लिंग समानता या पंचसूत्रीवर मोहिम, सर्वेक्षण, संशोधन, कार्यशाळा, प्रशिक्षणांच्या माध्यमातून समुपदेशनाचे कार्य करते.






सत्यघटनांवर आधारलेल्या या पुस्तकातील कथांमधून आपल्याला सध्याच्या समाजाचे वास्तवदर्शी चित्रण पाहायला मिळते. आजच्या आधुनिक जगात वावरतानाही महिलांना शारीरिक- मानसिक त्रासाला, आर्थिक फसवणुकीला कशाप्रकारे सामोरे जावे लागते, हे या कथांमधून समजते. मात्र, त्याचवेळी महिलांनी हातपाय गाळून न बसता स्वत:च्या गुणवैशिष्ट्यांप्रमाणे हर एक प्रसंगाला निडरतेने कसे सामोरे जायला हवे, हेदेखील या कथा सांगतात. राज्य महिला आयोगाचा आधार घेतल्यास कुठेही वाच्यता न होता कठीण प्रसंगातूनही कसा मार्ग काढता येतो, हे दाखविले जाते. महिला आयोग हे महिलांचे जणू हक्काचे माहेरच आहे. कुठल्याही प्रसंगात महिला आयोग साथ देईल, याची जाणीव हे पुस्तक करून देते.

***नुकतेच प्रकाशित झालेले हे पुस्तक हवे असल्यास आयोगाशी संपर्क साधा.**

**किंमत १०० रुपये**



# आम्ही प्रथमा

**क्रीडा, कला, साहित्य, उद्योग, शिक्षण आदी क्षेत्रात सर्वप्रथम विक्रम प्रस्थापित करणाऱ्या देशातील ११३ कर्तृत्ववान महिलांचा केंद्रीय महिला व बालकल्याण मंत्रालयाच्यावतीने राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांच्या हस्ते फर्स्ट लेडी पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला. यात महाराष्ट्रातील १५ महिलांचा समावेश आहे. त्यांचा परिचय.**

## प्राची एक्के

आज महिला सर्वच क्षेत्रामध्ये धाडसाने आणि आत्मविश्वासाने पुढे मार्गक्रमण करताना दिसत आहेत. मग ते क्षेत्र संशोधनाचे असो, राजकारणाचे असो किंवा क्रीडा अथवा चित्रपट क्षेत्राचे असो. अगदी चालक, वाहकाची भूमिकाही महिला उत्तमरीतीने पार पाडत आहेत. अशाच क्रीडा, कला, साहित्य, उद्योग, शिक्षण आदी क्षेत्रात सर्वप्रथम विक्रम प्रस्थापित करणाऱ्या देशातील ११३ कर्तृत्ववान महिलांचा केंद्रीय महिला व बालकल्याण मंत्रालयाच्यावतीने राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांच्या हस्ते फर्स्ट लेडी पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला. यात महाराष्ट्रातील १५ महिलांचा समावेश आहे. हिंदुस्थानी चित्रपट क्षेत्रातील पहिल्या महिला नायिका दुर्गाबाई कामत व देशातील पहिल्या महिला तबला वादक डॉ. अबन मिस्त्री यांना मरणोत्तर हा सन्मान जाहीर झाला. अशा या गौरवशाली महिलांचा परिचय तर करून घ्यायलाच हवा.



### दुर्गाबाई कामत
भारतीय चित्रपट क्षेत्रातील पहिल्या महिला नायिका

भारतीय चित्रपट क्षेत्रातील पहिल्या महिला नायिका दुर्गाबाई कामत यांचा जन्म १८९९ साली झाला. १९१३ साली त्यांनी भारतीय चित्रपटसृष्टीत प्रवेश केला. त्यांच्याबरोबर त्यांची १४ वर्षांची मुलगी कमलाबाई कामत (गोखले) यांनीही पहिली बाल अभिनेत्री म्हणून काम केले. दुर्गाबाई कामत या ज्येष्ठ मराठी अभिनेते चंद्रकांत गोखले यांच्या आजी होत्या. १७ मे १९९७ रोजी पुण्यात दुर्गाबाई कामत यांचे निधन झाले.

## डॉ. अबन मिस्त्री
देशातील पहिल्या महिला तबला वादक



डॉ. अबन मिस्त्री या केवळ भारतातच नव्हे तर परदेशातही प्रसिद्ध होत्या. ६ मे १९४० रोजी त्यांचा जन्म झाला. देशभरातील अनेक विद्यापीठांमधून त्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करीत होत्या. डॉ. अबन मिस्त्री यांनी चार मुख्य घराण्यांच्या तबलावादनाविषयी पुस्तके लिहिली होती. 'तबला और पखवाज के घराणे एवं परंपराए' हे त्यांचे पुस्तक हिंदी आणि इंग्रजी भाषेतही उपलब्ध आहे. तसेच अनेक विद्यापीठांमध्ये अभ्यासक्रमाचे आणि ग्रंथालयाचे हे पुस्तक एक भाग आहे. त्यांनी तबल्याच्या इतिहासाबद्दल मोठे संशोधन केले आहे. ३० सप्टेंबर २०१२ रोजी त्यांचे निधन झाले.

## सुरेखा यादव
प्रथम महिला प्रवासी रेल्वेचालक



भारतात सर्वप्रथम प्रवासी रेल्वे चालविण्याचा विक्रम करण्याऱ्या सातारा येथील सुरेखा यादव यांनी १९८८ मध्ये रेल्वेची पहिली 'महिला स्पेशल' लोकल ट्रेन चालवून या क्षेत्रातील पुरूषांची मक्तेदारी मोडून काढली. सातारा जिल्ह्यातील एका सुशिक्षित शेतकरी घरात त्यांचा जन्म झाला. ८ मार्च २०११ ला त्यांनी 'डेक्कन क्वीन' ही पुणे ते मुंबई (सीएटी) या कठीण मार्गावरील रेल्वे चालवून असा विक्रम करणारी आशिया खंडातील पहिली महिला रेल्वे चालक बनण्याचा मान मिळविला. इंजिन ड्रायव्हर, लोको पायलट, असिस्टंट ड्रायव्हर तसेच ड्रायव्हर अशा अनेक पदांवर त्यांनी काम केले आहे.

## भाग्यश्री ठिपसे
जागतिक ग्रँड मास्टर स्पर्धा जिंकणाऱ्या पहिल्या महिला बुद्धिबळपटू

जागतिक ग्रँड मास्टर स्पर्धा जिंकणाऱ्या पहिल्या महिला बुद्धिबळपटू मुंबई येथील भाग्यश्री ठिपसे यांनी पाच वेळा बुद्धिबळात राष्ट्रीय चॅम्पियनशिपचा किताब मिळविला आहे. त्या १९९१ मध्ये महिला आशियाई बुध्दिबळाच्या मानकरी ठरल्या. १९९९ च्या राष्ट्रकुल देशांच्या स्पर्धेत त्यांनी सुवर्ण तर तीन वेळा रजत पदकावर



मोहर उमटविली आहे. १९८६ मध्ये त्यांनी जागतिक बुध्दिबळ संघाचा 'जागतिक महिला मास्टर' हा बहुमान मिळविला आहे. बुध्दिबळातील त्यांच्या योगदानासाठी भारत सरकारने त्यांना पद्मश्री आणि अर्जुन पुरस्काराने सन्मानीत केले आहे.

## हर्षिनी कण्हेकर
देशातील पहिल्या महिला अग्निशमन अधिकारी



नागपूर येथील हर्षिनी कण्हेकर यांनी अग्निशमन अभियंता म्हणून रुजू होत देशातील अग्निशमन सेवा व महाविद्यालयांमध्ये काम करणारी प्रथम महिला होण्याचा सन्मान मिळविला आहे. सायन्समध्ये पदवीचे शिक्षण घेत असताना एनसीसी मध्ये त्या सहभागी झाल्या आणि तोच त्यांच्या जीवनाला कलाटणी देणारा क्षण ठरला. हर्षिनीने तिच्या करिअरमध्ये दिल्ली, कोलकता आणि मुंबई येथे फायर फायटर म्हणून असलेली जबाबदारी सक्षमपणे पार पाडली. दिल्ली येथे एका तीन फॅक्टरीत लागलेल्या आगीला नियंत्रित करण्यासाठी त्यांच्या अन्य सहकाऱ्यांसोबत त्यांनी सलग सहा तास काम केले. त्या सध्या फायर सर्व्हिसेसच्या उपसंचालक आहेत. त्यांना अनेक पुरस्कारांनी गौरविण्यात आले आहे.

## शीला डावरे
देशातील पहिल्या महिला ऑटोरिक्षा चालक



परभणी जिल्ह्यातील शीला डावरे यांनी पुरूषांची मक्तेदारी मोडीत काढत १९८८ मध्ये सर्वप्रथम ऑटोरिक्षा चालविली. त्याची नोंद लिम्का बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डने घेतली. त्यांनी सतत १३ वर्ष ऑटो रिक्षा चालविली. त्यानंतर महिला ऑटो रिक्षा चालकांसाठी प्रशिक्षण केंद्र सुरु केले.

## डायना एडलजी
भारतीय महिला क्रिकेट एकदिवसीय संघाच्या पहिल्या कर्णधार



हिंदुस्थानी महिला क्रिकेट एकदिवसीय संघाच्या पहिल्या कर्णधार डायना एडलजी यांनी १९७५ ते १९९५ पर्यंत हिंदुस्थानी महिला क्रिकेट संघाचे नेतृत्व करून महिला क्रिकेटला नवी दिशा दिली. महिला जागतिक क्रिकेट स्पर्धेत त्यांनी हिंदुस्थानचे दोन वेळा नेतृत्व केले. त्यांच्या कार्याची दखल घेत त्यांना पद्मश्री व अर्जुन पुरस्काराने सन्मानीत करण्यात आले. मुंबईत जन्मलेल्या डायना बालपणापासूनच क्रीडा क्षेत्राकडे आकर्षित झाल्या होत्या. रेल्वे वसाहतीत राहत असताना त्या टेनिस बॉलने क्रिकेट खेळायच्या. क्रिकेटमध्ये प्रवेश करण्यापूर्वी त्या राष्ट्रीय स्तरावर ज्युनियर विभागात बास्केट बॉल आणि टेबलटेनिस खेळात होत्या. माजी कसोटी क्रिकेटपटू लाला अमरनाथ यांनी आयोजित केलेल्या क्रिकेट कॅम्पमध्ये त्यांच्या कौशल्यांचा गौरव झाला. डायना यांनी नंतर रेल्वेसाठी आणि त्यानंतर भारतीय राष्ट्रीय क्रिकेट संघासाठी खेळण्यास सुरुवात केली. १९७५ मध्ये त्यांनी पहिली मालिका खेळली. १९७८ मध्ये त्या टीमच्या कप्तान झाल्या. डायना यांना १९९३ मध्ये अर्जुन पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. भारत सरकारने २००२ मध्ये त्यांना पद्मश्री देऊन सन्मानित केले. ३० जानेवारी २०१७ रोजी बीसीसीआय प्रशासकीय समितीत त्यांची नियुक्ती करण्यात आली.

## डॉ. भारती लव्हेकर
देशातील पहिली सॅनिटरी पॅडची बँक सुरू



देशातील पहिली सॅनिटरी पॅडची बँक सुरू करणाऱ्या डॉ. भारती लव्हेकर या मुंबईतील वर्सो वा येथील आमदार आहेत. 'ती' संस्थेच्या माध्यमातून त्यांनी सार्वजनिक ठिकाणी व शाळांमध्ये सॅनिटरी पॅड एटीएम आणि डिस्पोजल मशीन स्थापित केल्या. मुंबईतील आंबोली आणि ओशिवरा पोलीस ठाण्यामध्ये सॅनिटरी पॅड व्हेंडिंग मशिन्स उपलब्ध करून देण्यात आली आहे. मुंबईतील पोलीस ठाण्यात ही मशीन बसवण्याचा हा पहिला उपक्रम आहे. तळागाळातील महिलांचे ते पाच दिवस सुसह्य करण्याच्या दृष्टिकोनातून झटणाऱ्या आमदार लव्हेकर यांनी हा उपक्रम आपल्या वर्सोवा विधानसभा मतदारसंघात सुरू केला असून येथील शाळा, महाविद्यालय, सरकारी कार्यालय आणि अन्य ठिकाणी त्यांनी याआधी ही मशीन उपलब्ध करून दिली आहेत. डॉ. लव्हेकर यांची सामाजिक संस्था ' ती फाऊंडेशन' २००९ पासून कार्यरत आहे. त्यांच्या डॉटर्स ऑफ वर्सोवा' या मोहिमेअंतर्गत सॅनिटरी पॅड्सचे मोफत वाटप, मोफत सॅनिटरी पॅड एटीएम आणि डिस्पोझल मशिन्स, मॅनस्ट्रुअल हेल्थ किट सॅनिटरी पॅड बँकची सुविधा उपलब्ध करून दिली आहे. त्यांनी स्त्रीभृण हत्या प्रतिबंधासह महिलांच्या आरोग्य, शिक्षणासाठी महत्वाचे कार्य केले आहे.

## अरुणा राजे पाटील
चित्रपटसृष्टीतील पहिल्या महिला तंत्रज्ञ

हिंदुस्थानी चित्रपट सृष्टीतील पहिल्या महिला तंत्रज्ञ पुण्याच्या अरुणा राजे पाटील यांनी १९६९ मध्ये हिंदुस्थानी चित्रपट सृष्टीत प्रवेश केला. अरुणा राजे पाटील यांनी पटकथाकार, संपादक, दिग्दर्शक आणि निर्माता म्हणून वेगळी ओळख निर्माण केली आहे. १९८८ साली सर्वात धाडसी चित्रपट त्यांनी बनवला. तो त्यांच्या आयुष्यातील टर्निंग पॉईंट ठरला. पतीपासून न राहिलेला गर्भ वाढवायचा निर्णय घेणाऱ्या स्त्रीची ही कथा होती. या चित्रपटाच्या निर्मात्या, दिग्दर्शकापासून संकलनापर्यंतच्या अनेक जबाबदाऱ्या त्यांनी स्वतः पेलल्या. स्वातंत्र्यसैनिक पित्याच्या पोटी जन्मलेल्या अरुणाजींचा आतापर्यंतचा हा प्रवास म्हणजे एक चित्रपटच आहे. अरुणा राजे यांनी बव्हंशी छोट्या बजेटचे चित्रपट केले. त्यांच्या 'रिहाई'तही विनोद खन्ना आणि हेमा मालिनी हे आघाडीचे आणि स्टारडम असलेले कलावंत असले तरी तो चित्रपट कमी बजेटचा होता. अशा वेळी साधनांची जुळवाजुळव हे आव्हानात्मक काम असते. योग्य लोकेशनसाठी, शूटिंगसाठी आवश्यक असलेली सामग्री जमा करणे सर्वांत अवघड असते. 'फ्रीडम माय स्टोरी' हे त्याचे आत्मकथन प्रसिद्ध आहे. पुरुषप्रधान क्षेत्रात स्त्रीत्वाच्या मर्यादा ओलांडणारा, आयुष्य जगण्याच्या आड येणाऱ्या बंधनांच्या पलीकडे नेणारा हा विस्तीर्ण पट त्यांनी आडपडदा न ठेवता या आत्मकथनात मांडला आहे.



## स्नेहा कामत
पहिली मोटार ड्रायव्हिंग प्रशिक्षण संस्था चालक




देशातील पहिली मोटार ड्रायव्हिंग प्रशिक्षण संस्था स्थापन करणाऱ्या मुंबई येथील स्नेहा कामत यांनी २०१२ मध्ये 'शी कॅन ड्राइव्ह'

या उपक्रमाच्या माध्यमातून केवळ महिलांसाठी ड्रायव्हिंग प्रशिक्षण देण्याच्या कार्यास प्रारंभ केला. त्यांनी ४०० पेक्षा अधिक महिलांना प्रशिक्षित केले आहे.

## डॉ. इंदिरा हिंदुजा
देशातील पहिल्या टेस्ट ट्यूब बेबीची प्रसूती



देशातील पहिल्या टेस्ट ट्यूब बेबीची प्रसूती करणाऱ्या मुंबईच्या प्रसिद्ध स्त्रीरोग तज्ज्ञ डॉ. इंदिरा हिंदुजा यांनी १९८९ मध्ये आयव्हीएफ सेंटरची स्थापन केली.सध्या त्या पी. डी. हिंदुजा राष्ट्रीय रुग्णालय आणि वैद्यकीय संशोधन केंद्रात कार्यरत आहेत. त्यांच्या कार्याची दखल युवा भारतीय पुरस्कार (१९८७), उत्कृष्ट महिला नागरिक महाराष्ट्र राज्य पुरस्कार (१९९७) भारत निर्माण पुरस्कार (१९९४) मुंबईच्या महापौरांच्या हस्ते आंतरराष्ट्रीय महिला दिवस पुरस्कार (१९९५; २०००), राज्यपालांद्वारे धनवंतरी पुरस्कार (२०००) आणि भारत सरकारतर्फे देण्यात येणारा पद्मश्री पुरस्कार (२०११) आदी पुरस्कारांनी त्यांना सन्मानित करण्यात आले आहे.

## उपासना मकाती
अंधांसाठी देशातील पहिले व्हाईट प्रिंट हे लाईफ स्टाइल मासिक ब्रेल लिपीत प्रकाशित केले



अंधांसाठी देशातील पहिले व्हाईट प्रिंट हे लाईफ स्टाइल मासिक ब्रेल लिपीत प्रकाशित करणाऱ्या मुंबई येथील उपासना मकाती यांनी २०१३ मध्ये हे मासिक सुरू केले. हे मासिक शाळा, महाविद्यालये, वृद्धाश्रम, रुग्णालय, ग्रंथालयात उपलब्ध करून दिले जाते. मकाती यांच्या कार्याची दखल घेऊन २०१६ मध्ये फोर्ब्सने आपल्या यादीत स्मार्ट सीईओ म्हणून पहिल्या ३० नावात त्यांचा समावेश केला होता.

## तारा आनंद
डिजिटल आर्टद्वारे हिंदुस्थानातील महिला योद्ध्यांचा परिचय



डिजिटल आर्टद्वारे हिंदुस्थानातील महिला योद्ध्यांचा परिचय करून देणारी मुंबईची एकोणीस वर्षीय तरुणी तारा आनंद यांचाही या पुरस्काराने गौरव करण्यात आला. 'आय म नो मॅन' नावाने त्यांनी हिंदुस्थानातील महिला योद्ध्यांचे केलेल्या रेखाटनांचे जागतिक स्तरावर कौतुक झाले आहे.

## स्वाती पिरामल
'असोसिएटेड चेंबर्स ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीज ऑफ इंडिया'च्या पहिल्या महिला अध्यक्ष



मुंबई येथील स्वाती पिरामल या देशातील आघाडीच्या उद्योजक असून आरोग्य, शिक्षण सेवामध्ये आमुलाग्र बदल घडविण्यात त्यांचे योगदान आहे. 'असोसिएटेड चेंबर्स ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीज ऑफ इंडिया' (असोचेम) च्या पहिल्या महिला अध्यक्ष म्हणून त्यांचा नावलौकीक आहे. आरोग्य सेवेत त्यांचे मोलाचे योगदान आहे. त्या १९८० साली मुंबई विद्यापीठातून एमबीबीएस झाल्या. पिरामल इंटरप्राइझेस लिमिटेड या कंपनीच्या त्या उपाध्यक्ष आहेत. स्वस्त दारात औषधे उपलब्ध करून देण्यासाठी ही कंपनी कार्यरत आहे. मधुमेह, संधिवात, हृदयरोग आदी गंभीर आजारांवर औषधे शोधून काढली आहेत. मुंबईतील गोपीकृष्ण पिरामल रुग्णालयाच्या त्या संस्थापक आहेत. मूत्रपिंडाच्या आजाराने ग्रस्त असणाऱ्या रुग्णांसाठी त्यांनी क्लिनिकल पोषण विषयक पुस्तके लिहिली आहेत. गेल्या २५ वर्षात सर्वांत शक्तिशाली महिलांच्या यादीत त्यांनी आठ वेळा नामांकन मिळवले आहे. पंतप्रधानांच्या वैज्ञानिक सल्लागार समितीवर तसेच व्यापार परिषदेतही त्या काम पाहतात. व्यापार, नियोजन, पर्यावरण, कला, महिला उद्योजकता, राष्ट्रीय एकात्मता आणि प्रादेशिक विकासासाठी असणाऱ्या सरकारी सार्वजनिक धोरण समित्यांचेही काम त्या पाहतात. त्याच्या या योगदानाबद्दल (२००४-०५) बीएमए मॅनेजमेंट महिला अचिव्हर ऑफ द इयर अवॉर्ड, (२००६) फ्रेंच अध्यक्ष याक शिराक यांच्याकडून नाइट ऑफ द ऑर्डर ऑफ मेरिट, (२००६) भारताच्या पंतप्रधानांच्या विज्ञान व तंत्रज्ञान विभागाच्या यंग लीडरमध्ये लखनौ राष्ट्रीय नेतृत्व पुरस्कार, (२००६) फार्मा बायोटेक इंडस्ट्रीज मध्ये उत्कृष्ट कामगिरी साठी चेमेटेक फार्मा पुरस्कार, (२००७) राजीव गांधी फाउंडेशनतर्फे आउटस्टँडिंग वूमन अचिव्हरसाठी राजीव गांधी पुरस्कार, (२०१०) लंडन हिल्टन येथे, ब्रिटनमध्ये ग्लोबल सशक्तीकरण पुरस्कार, (२०१२) भारताच्या उच्च नागरी सन्मानांपैकी एक, भारताचे राष्ट्रपती श्रीमती प्रतिभा पाटील यांनी पद्मश्री पुरस्कार दिला. (२०१२) स्वाती यांना अलमुनी मेरिट पुरस्कार, (२०१२) होप इंडियामधून न्यूयॉर्क येथे लोटस अवॉर्ड प्राप्त, (२०१४) स्त्री शक्ती पुरस्कार आदी अनेक पुरस्कारांनी त्यांना सन्मानित करण्यात आले आहे.

# एका बिस्कीटच्या पुड्याने केली कमाल...




**प्रेमविवाहाला पंधरा वर्षे उलडल्यानंतर पतीचे दुसऱ्या स्त्रीशी विवाहबाह्य संबंध असल्याचे वैशालीला समजले. वारंवार सांगूनही त्याच्या वागण्यात फरक न पडल्याने तिने महाराष्ट्र राज्य महिला आयोगाकडे मदत मागितली. एक तुटू पाहणारा संसार आयोगाच्या प्रयत्नांमुळे पुन्हा फुलला.**

## धनंजय बिजले

विशाल (मूळचे नाव बदलले आहे) तसा जेमतेम शिकलेला... पण कष्ट करण्याची, कोणतेही काम करण्याची त्याची नेहमीच तयारी असायची. शिकत असतानाच गल्लीतल्या वैशाली (मूळचे नाव बदलले आहे) या मुलीवर तो प्रेम करू लागला. खरं तर विशाल फार काही कमवत नव्हता. थोडीफार कामे करत होता. पण तरीही त्याचे वैशालीवर निस्सीम प्रेम होते, याचे वैशालीला नेहमीच अप्रूप वाटायचे. त्यांच्या रोजच्या भेटीगाठी व्हायच्या. यातून वैशालीलादेखील त्याचा स्वभाव आवडू लागला. त्यामुळे त्यांचे प्रेम बहरू लागले. दोन वर्षे त्यांच्या या प्रेमळ गाठीभेटी होतच होत्या. त्यामुळे एकमेकांवर त्यांचा विश्वास दिवसेंदिवस चांगलाच वृद्धिंगत होत होता. आता ते एकमेकांकडे जणू 'जीवनसाथी' या नात्याने पहायला लागले होते. आपण दोघे चांगला संसार करू शकतो, जीवनाची साथ निभावू शकतो याबाबत दोघांच्या मनाची खात्री पटली होती. पण 'विचारायचे कोणी' असे झाले होते. अखेर मनाचा हिय्या करून विशालनेच पुढाकार घेतला व एक पाउल पुढे टाकले. त्याने वैशालीला लग्नासाठी मागणी घातली. खरं तर वैशालीचा मनातून होकारच होता. पण एक मोठा प्रश्न होता, तो म्हणजे तिच्या घरच्यांचा... कारण विशालचे मासिक उत्पन्न फार काही चांगले नव्हते. कधी तो रिक्षा चालवायचा, तर मध्येच हा व्यवसाय सोडून कोठे तरी दुकानात कामाला लागायचा. त्यामुळे त्याच्या हातात जेमतेम पैसे पडत. स्थिर असे उत्पन्न नसायचेच. पण वैशालीवर मात्र तो जीवापाड प्रेम करायचा. वैशालीलादेखील ही बाब माहिती होती. त्यामुळे मनात ती म्हणायची की, विशाल गरीब असला म्हणून काय झाले, त्याचे माझ्यावर प्रेम आहे, ही बाब फार मोलाची आहे. आजची परिस्थीती उद्या बदलेल. तोही चांगले उत्पन्न मिळवेल. त्यामुळे वैशाली त्याच्याशी लग्न करण्यास तयार झाली. पण 'घरच्यांना विचारून मी अंतिम निर्णय घेईन' असे त्याने विशालला सांगितले. विशाललाही काही गडबड नव्हती. तोही याला तयार झाला.

// स्त्रीशक्तिरतुल्या सदा //




वैशालीने घरात विशालशी लग्न करण्याचा विषय काढताच घरात जणू भूकंपच झाला. वैशाली काही फार श्रीमंत घरातील नव्हती. घरी गरिबीच होती. पण तिच्या वडिलांना किमान नोकरी होती. त्यांना वाटे की, जावयाला चांगली नोकरी असावी. त्यामुळे त्यांनी या लग्नाला जोरदार विरोध केला आणि त्यांनी वैशालीसाठी स्थळे पाहण्यास सुरुवात केली. येणारी स्थळे वैशाली काही ना काही कारणे सांगून नाकारत असे. कोणत्या परक्या मुलाशी लग्न करण्यापेक्षा विशालशीच विवाह करायचा हे तिने आता मनाशी पक्के ठरविले होते. तिच्या मते तिला निदान विशालचा स्वभाव तरी चांगला माहिती होता. नंतर तिनेच विशालपुढे पळून जाऊन विवाह करण्याचा प्रस्ताव मांडला. झाले... एक दिवस दोघांनीही घर सोडले व मुंबई गाठली. रीतसर नोंदणी पद्धतीने विवाह केला. मुंबईसारख्या प्रचंड मोठ्या महानगरीत संसार सुरू केला.

विशाललादेखील आता जबाबदारीची चांगली जाणीव झाली होती. तोही गंभीर झाला. त्याने नेटाने रिक्षा चालवायची असा निर्णय घेतला व तो कामाला लागला. रोज सकाळी तो दिवसभरासाठी भाड्याने रिक्षा घ्यायचा व दिवसभर रिक्षा चालवण्याचा व्यवसाय करायचा. वैशालीनेही एका कंपनीत नोकरी करण्यास सुरुवात केली. जे काही जेमतेम पैसे मिळायचे त्यातून त्यांचा संसार चांगल्याप्रकारे सुरू झाला. पुढे त्यांना पहिली मुलगी झाली. त्यामुळे दोघांच्याही आनंदाला पारावार उरला नाही. दोन वर्षांनी आणखी एक मुलगी झाली. अशा प्रकारे हे चौकोनी कुटंब हसत खेळत राहू लागले. सारे दिवस काही सारखे नसतात. दोघांच्या सुरुवातीच्या कष्टाचे आता चीज होऊ लागले. त्यांच्या हाती चांगले पैसे जमा झाले. त्यातून विशालने स्वतःची रिक्षा विकत घेतली. मुलींना चांगले शिकवून मोठे करायचे हे दोघांनीही ठरवले. त्यामुळे जेथे चांगल्या शाळा आहेत त्या परिसरात ते रहायला लागले. मुलीही अभ्यासात हुशार होत्या. थोरली मुलगी तर नेहमी वर्गात पहिल्या तीन क्रमांकांत असायची. आता लग्नाला चांगली पंधरा वर्षे झालेली. त्यामुळे त्यांचा संसार चांगलाच रुळला होता. विशाल व वैशाली चांगले पैसे मिळवत होते. त्यामुळे घरात हळू हळू सुबत्ता येत होती. त्यातून घरात टिव्ही. फ्रीज, मोबाईल अशा नव्या जमान्यातील वस्तू आपसुख आल्या होत्या.

पण सारे काही सुरळीत सुरू असताना विशाल मात्र हल्ली घरात पहिल्यासारखा आनंदी दिसायचा नाही. नेहमी अस्वस्थ असायचा. त्याला घरी येण्यासही पहिल्यापेक्षा जास्त वेळ लागायचा. रात्री जेवणासाठी वैशाली व लाडक्या दोन मुली त्याची वाट पाहत असायच्या. त्यामुळे रोजचे रात्रीचे जेवण हे कुटुंब नेहमी एकत्रितच घ्यायचे. मात्र, हल्ली हल्ली विशाल रात्री घरी येण्यास उशीर करू लागला. असे झाले की घरी फोन करून त्यांना जेवण करून घेण्यास सांगायचा. वैशालीला वाटे की, रिक्षा कोठे तरी लांब असेल, प्रवासी असतील त्यामुळे येण्यास उशीर होतोय. पण उशिराचे कारण वेगळेच होते. विशालचे घराबाहेर दुसर्याच एका महिलेशी अफेअर सुरू होते. तो अनेकदा रिक्षा घेऊन बाहेर पडायचा व दिवसभर त्या महिलेबरोबरच फिरत असायचा. वैशाली सकाळी उठली की विशालला डबा भरून द्यायची व नोकरीला पळायची. संध्याकाळी घरी दमून भागून आल्यावर मुलींचा थोडा अभ्यास घ्यायची. घरची कामे आटपायची व दुसर्या दिवशीची तयारी करायची. यातच तिचा दिवस कधी संपून जायचा हे तिलाही कळायचे नाही. विशाल मात्र भरकटत चालला आहे याची तिला खबरबातच नव्हती.

मात्र अलीकडे विशाल घरी यायला नेहमीच उशीर करायला लागला. शिवाय त्याची घरात चिडचिड वाढू लागली होती. आता त्यांची थोरली मुलगी सहावीला, तर धाकटी चौथीला होती. त्यामुळे मुलींनाही वडिलांच्या वागणुकीतला फरक जाणवत होता. त्याही आईला म्हणायच्या की, ''बाबा असे का करत आहेत. जेवायला का घरी येत नाहीत?'' वैशाली काही तरी उत्तरे देऊन वेळ मारून न्यायची. पण आता तिलाही विशालच्या स्वभावातला फरक जाणवायला लागला. शिवाय विशाल आता नेहमीप्रमाणे घरात पैसे देत नाही, मिळवून आणत नाही, हेदेखील तिला लक्षात आले होते. एका रविवारी तिला रिक्षात महिलेची हेअरपिन सापडली. 'ही कुणाची?' असा प्रश्न तिने विशालला विचारला. त्यावर विशालने प्रवाशांची असेल, असे सांगितले. तोवर सारे काही ठीक चालले होते. विशालचे घराबाहेरील अफेअर सुरूच होते. मात्र आता वैशालीच्या मनात संशयाचा भुंगा घिरट्या घालू लागला होता. तिला विशालच्या वेगळ्या वागण्याबद्दल संशय आला होता. ती रोज रात्री आता रिक्षा चेक करू लागली. तिला पुन्हा रिक्षात हेअरपिन सापडली. त्यावर ती शांतच राहिली. पुन्हा दोन दिवसांनी तोच प्रकार. त्यावेळी मात्र तिने विशालला चांगलेच फैलावर घेतले. विशालने हेअरपिन प्रवाशांची आहे, असे सांगून वेळ मारून नेण्याचा प्रयत्न केला. पण आता मात्र वैशालीला त्याच्याविषयी पक्का संशय बळावला होता.

तो झोपल्यावर तिने त्याचा मोबाईल फोन तपासला. त्यावरील व्हाटस्‌ॲप चॅटिंग पाहून तिचे डोळे खाड्‌कन उघडले. आपल्या नवर्याचे दुसर्या महिलेशी प्रेम प्रकरण सुरू असल्याचे तिला समजताच तिच्या पायाखालची जमीनच सरकली. तिने रात्रीच सारे घर डोक्यावर घेतले. आपल्या मुलींना काय वाटेल याची जराही तमा न बाळगता ती विशालवर तुटून पडली. विशालची तर जणू बोबडीच वळली. काय करावे ते त्याला सुचेना. तो गयावया करू लागला. त्याने माफी मागितली. पण आता वैशाली चांगलीच इरेला पेटली होती. त्यामुळे घरातील आनंद, शांतता उद्ध्वस्त झाली. वैशालीने त्याला सज्जड दम भरला. मग काही दिवस शांततेत गेले. पण आता मात्र वैशाली विशालवर करडी नजर ठेवू लागली. घरात येण्याची वेळ त्याला बजावू लागली. जरा उशीर होतोय म्हटले की ती फोन करायची. त्या वेळी अनेकदा विशाल रिक्षा चालवत असायचा. पण वैशाली त्यावर पटकन विश्वास ठेवायची नाही. प्रवाशांसमोरच ती विशालला जोरजोरात रागवायला सुरुवात करायची. यामुळे विशालचाही तोल जायचा. खरं तर चूक विशालचीच होती. त्याने दुसर्या महिलेशी असलेले संबंध पूर्ण तोडले नव्हते. मात्र तिला भेटायचे, तिच्याशी बोलण्याचे फार कमी केले होते. पण आता वैशालीच्या सततच्या संशय घेण्याला तो पुरता वैतागला होता. रिक्षा चालू असताना तिचा फोन आला तर तो गप्प बसायचा, पण घरी येताच वैशालीला शिव्या द्यायचा. कधी कधी हातही उगारायचा. यामुळे काही महिन्यांपूर्वी घरात असलेले आनंदी वातावरण केव्हाच बदलले होते. त्याची जागा आता भांडण, तणावाने घेतली होती.

आई-बाबांच्या रोजच्या भांडणांमुळे मुलींच्या अभ्यासावर विपरीत परिणाम होत होता. मुलींचे ना घरात, ना शाळेत कोठेच लक्ष लागत नव्हते. अशातच एक दिवस वैशालीला पुन्हा एकदा रिक्षात हेअरपिन सापडली आणि ही पिन उंटाच्या पाठीवरील शेवटची काडी ठरली. त्यावेळी तिने विशालला एक थप्पड लगावली व मुलींसह तिने घर सोडले. खरे तर एवढ्या मोठ्या शहरात ती कोठे जाणार आहे, असे वाटून विशालने माघार घेण्यास नकार दिला. पण वैशाली सरळ निघून गेली व दुसरीकडे राहू लागली. कसातरी महिन्याचा काळ गेला असेल. तिला विशाल हवा होता पण त्याला जबर इंगाही दाखवायचा होता... जेणेकरून तो ताळ्यावर येईल. काय करता येईल, याचा विचार करत असताना तिला कोठून तरी महिला आयोगाची माहिती मिळाली. तिने मग महिला आयोगाकडे नवर्याविषयी थेट तक्रार नोंदविली. तक्रारीत तिने सारी व्यथा मांडली होती. आयोगाच्या अध्यक्षा विजयाताई रहाटकर यांना सारी परिस्थिती पटकन लक्षात आली. यातून काही तरी मार्ग काढला पाहिजे. संशयामुळे सारं कुटुंब रस्त्यावर येण्याची शक्यता असल्याचे त्यांच्या लक्षात आले. त्यांनी समुपदेशकांना पटकन या कुटुंबाची बैठक घडवून आणण्याचा आदेश दिला. वैशालीच्या तक्रारीवरून विशालला आयोगाने पत्र धाडले.

विशालही वैशालीच्या रोजच्या संशयी स्वभावाला कंटाळला होता. त्यामुळे तोदेखील जरा रागातच होता. बैठकीचा दिवस उजाडला. आयोगाच्या कार्यालयात एका बाजूला वैशाली व तिच्या दोन मुली तर समोर विशाल असे चित्र. विशाल आपली चूक कबूल करण्यास तयार नव्हताच. तो रागातच होता. वैशाली त्याच्यावर एकापाठोपाठ एक आरोप करीत होती. खरं तर विशालच्या चुकीनेच ही सारी परिस्थिती उद्भवली होती. पण रागामुळे त्याचा मेंदू तशा प्रकारे विचारच करत नव्हता. समुपदेशकांनी दोघांनाही समजून सांगण्याचा प्रयत्न केला. मुलींच्या भवितव्याचा विचार करा. कोणीतरी एकाने माघार घेतली तर मुलींचे भविष्य उज्ज्वल आहे, हे परोपरीने समजावून सांगण्याचा प्रयत्न केला. पण हे प्रयत्न व्यर्थ ठरले. वैशालीने त्याच्यासमवेत राहण्यास थेट नकार दिला. विशालही तिच्यासमवेत राहण्यास तयार नव्हता. आई-बाबांची भांडणे पाहून मुली भेदरून गेल्या होत्या. त्यांच्या डोळ्यांतून अश्रूंच्या धारा थांबायचे नाव घेत नव्हत्या. पण त्यांचे काही चालणार नव्हते. त्यामुळे समुपदेशकांनीही हात टेकले. तुमचा निर्णय तुम्ही घ्यायचा आहे, असे त्यांनी हताशपणे सांगितले. मात्र तक्रारअर्ज पाहत असताना समुपदेशकाची नजर सहजच मुलींच्या जन्मतारखांवर गेली होती. त्याच्या लक्षात आले की आज तर थोरल्या मुलीचा वाढदिवस आहे. तिचा वाढदिवस साजरा करण्याचे सोडाच, तिचे आई- वडील आज विभक्त होण्याच्या बाता करीत आहेत. हे पाहून त्याच्याही मनात धस्स झाले. त्याने खिशातील पैसे शिपायला देत मुलींसाठी दोन बिस्कीटचे पुडे आणण्यास सागितले. विशाल-वैशालीला तो म्हणाला की, तुम्हाला काय करायचेय ते करा; पण आज तुमच्या थोरल्या मुलीचा वाढदिवस आहे. आम्ही तो आयोगाच्या कार्यालयात अगदी साध्या पद्धतीने साजरा करणार आहे. तिचा शाळेत पहिला नंबर येतो. आज ती शाळेत गेली असती तर तिथे तिच्यावर कौतुकाचा वर्षाव झाला असता. तुमच्या भांडणामुळे तिला आज येथे यावे लागले आहे. हा दिवस पहावा लागत आहे. शिपायाने बिस्कीटचे पुडे आणल्यानंतर समुपदेशकांनी दोघींना ते दिले. महिला आयोगातील कर्मचार्यांनी त्या हुशार मुलीचे वाढदिवसानिमित्त अभीष्टचिंतन केले आणि शुभेच्छा दिल्या. हे पाहून विशालला आपराधीपणाची जाणीव झाली. रागाच्या भरात तो या लाडक्या कन्येचा वाढदिवसदेखील विसरला होता. त्याचे मन त्याला आता आतल्या आत खात होते. त्याच्या डोळ्यांसमोरून तिचा पहिला वाढदिवस, तिची शाळेतील कामगिरी, तिच्यासमवेतचे सोनेरी क्षण. वैशालीसमवेतचे प्रेमातील दिवस सारे काही एका क्षणात तरळून गेले. दोन मुलींच्या या प्रेमळ बापाला गहिवरून आले. कशासाठी आपण हे करत आहोत, असे त्याला त्या क्षणी वाटले. आपल्या वागण्याने डोळ्यासमोर होत्याचे नव्हते होत आहे याची जाणीव त्याला झाली. सुंदर रांगोळीची आपण राख करीत आहोत, हे त्याला मनोमन पटले. काही वेळापूर्वीचा त्याचा सारा राग निवळला. मुलींना त्याने गच्च मिठीत जवळ घेतले. सार्या चुका कबूल केल्या व पुन्हा अशी चूक न करण्याचे आश्वासन दिले. ''घरी चला, रात्री धुमधडाक्यात वाढदिवस साजरा करू, बाहेर जेवायला जाऊ,'' असे सांगत त्याने मनापासून साद घातली. वैशालीचे डोळेही पाणावले. ''आई, आता बाबांना शेवटचे माफ कर'' अशी विनवणी मुली करू लागल्या. यावेळी वैशालीही सद्गदित झाली. पाहता पाहता मोडणारा संसार पुन्हा उभारला. मुलींना प्रेमळ बाबा मिळाले. मुलीचा वाढदिवस आयोगाच्या कार्यालयात साजरा झाल्यानेच हे सारे घडले.

**(सौजन्य : ''साद दे, साथ घे'')**



जागतिक महिला दिन आणि सिडको मनस्वी स्त्री संसाधन केंद्र, कळंबोली (नवी मुंबई) यांच्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात मार्गदर्शन करताना महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर. सिडको मनस्वी स्त्री संसाधन केंद्र, कळंबोली यांच्यावतीने महिलांना कायदेशीर मार्गदर्शन, समुपदेशन यासोबतच सक्षमीकरण या करिता विविध उपक्रम राबवले जातात. वर्धापन दिन प्रसंगी मान्यवरांच्या उपस्थितीत सिडको मनस्वी स्त्री संसाधन केंद्रच्या अहवालाचे प्रकाशन करण्यात आले. यावेळी पनवेल महानगरपालिकेच्या महापौर डॉ. कविता चौथमल, आयुक्त सुधाकर शिंदे तसेच नगरसेविका उपस्थित होत्या.



---





रांची (झारखंड) येथे झालेल्या दुसऱ्या एलपीजी परिषदेला राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर उपस्थित होत्या. या कार्यक्रमला केंद्रीय पेट्रोलियम मंत्री धर्मेंद्र प्रधान आणि झारखंडचे मुख्यमंत्री रघुवर दास हेही उपस्थित होते. पंतप्रधान उज्वला योजनेला अधिक गतिमान करण्यासाठी ही परिषद उपयुक्त ठरली.

# महिलांसाठी सुहिता हेल्पलाइन

## हेल्पलाइन क्रमांक ७४७७७२२४२४

साद प्रतिनिधी




कौटुंबिक अत्याचार, कामाच्या ठिकाणी लैंगिक शोषण यासारख्या अनेक अन्यायाला बळी पडणाऱ्या आणि त्यामुळे नैराश्यग्रस्त झालेल्या महिलांच्या मदत आणि मार्गदर्शनासाठी महाराष्ट्र राज्य महिला आयोगाने सुहिता या नावाची समुपदेशन हेल्पलाइन कार्यान्वित केली आहे. तसेच, आयोगामध्ये मानवी तस्करीविरोधात (ह्युमन ट्रॅफिकिंग) विशेष कक्ष सुरू करण्याची घोषणा महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष विजया रहाटकर यांनी मुंबईत केली.

आंतरराष्ट्रीय महिला दिनाच्या निमित्ताने आयोजित केलेल्या कार्यक्रमामध्ये संकटग्रस्त, अन्यायग्रस्त महिलांसाठी अतीव उपयोगी ठरू शकते, अशी समुपदेशन हेल्पलाइन कार्यान्वित करण्याचा सोहळा गुरूवारी आयोगाच्या वांद्रे येथील मुख्यालयात पार पडला. हेल्पलाइनचे अनावरण अध्यक्षा विजया रहाटकर यांच्या हस्ते झाले. ७४७७७२२४२४ हा हेल्पलाइनचा मोबाइल क्रमांक आहे. हेल्पलाइन सुरू झाल्यापासून राज्याच्या कानाकोपऱ्यातून ५५० कॉल आले. पहिला कॉल यवतमाळ जिल्ह्यातील महिलेने केला होता.



महिलांसाठी विविध प्रकारच्या हेल्पलाइन आहेत, पण संकटकाळात, नैराश्येच्या गर्तेत असताना त्यांना धीर देणारे, त्यांचे समुपदेशन करणारी हेल्पलाइन देशात इतरत्र नसावी,  असे सांगून विजया रहाटकर यांनी या हेल्पलाइनमुळे महिलांना उत्तम प्रकारची मदत आणि मार्गदर्शन मिळण्याची खात्री व्यक्त केली. या वेळी रहाटकर यांनी आयोगाच्या भविष्यातील उपक्रमांची माहिती दिली. त्यामध्ये मानवी तस्करीविरोधातील तक्रारींचे वाढते प्रमाण लक्षात घेता, आयोगामध्ये विशेष कक्ष स्थापन करणे आणि तस्करीच्या पीडितांचे पुनर्वसन करण्यासाठी 'आम्ही

**क्रमांक : ७४७७७ २२४२४**
**वेळ : कार्यालयीन कामकाजाची वेळ.**
**भाषा : मराठी आणि हिंदी.**



उद्योगिनी' आणि संयुक्त राष्ट्रांची विकास संस्था (यूएनडीपी) यांच्या मदतीने कौशल्य विकास प्रशिक्षण सुरू करण्याचा मनोदय व्यक्त केला.

याच निमित्ताने 'साद दे, साथ घे' आणि 'प्रवास सक्षमतेकडे' या दोन पुस्तकांचे प्रकाशन झाले. याच निमित्ताने 'साद दे, साथ घे' आणि 'प्रवास सक्षमतेकडे' या दोन पुस्तकांचे प्रकाशन झाले. कौटुंबिक हिंसाचाराला बळी पडलेल्या महिलांचे समुपदेशन करणाऱ्यांसाठी 'प्रवास सक्षमतेकडे' हे मार्गदर्शक पुस्तक तयार करण्यात आले आहे. आयोगाने यशस्वीपणे सोडविलेल्या २५ प्रकरणांची माहिती 'साद दे.. साथ घे..' या पुस्तकात देण्यात आली आहे.त्याचवेळी आयोगाच्या सभागृहाचे नूतनीकरणाचेही उदघाटन झाले.

यावेळी व्यासपीठावर आम्ही उद्योगिनीच्या मीनल मोहाडीकर, संयुक्त राष्ट्र विकास संस्थेच्या आफरीन सिद्दीकी, अभिनेत्री अनुराधा राजाध्यक्ष, आयोगाच्या सदस्या विंदा कीर्तीकर, ॲड. आशा लांडगे आणि सदस्य सचिव डॉ. मंजूषा मोळावणे उपस्थित होत्या.

### सुहिता हेल्पलाइनविषयी :

महिलांना एखाद्या प्रसंगी तातडीने मदत आणि समुपदेशन मिळण्याची गरज असते. ग्रामीण भागातील महिला अनेक वेळा एखाद्या प्रसंगात आपल्यावर झालेल्या अन्यायाची वाच्यता कधी भीतीपोटी, तर कधी अज्ञानापोटी कुठे करत नाहीत. आपल्यावर झालेल्या अत्याचाराबाबत कुणाशी संवाद साधत नाहीत. त्यातून त्यांचे मानसिक खच्चीकरण तर होतेच; शिवाय त्यांच्यावरच्या अन्यायाला वाचाही फुटत नाही. म्हणूनच 'सुहिता' ही हेल्पलाइन तयार करण्यात आली आहे.



### कार्यपद्धती :

या हेल्पलाइनच्या माध्यमातून समोरच्या महिलेचे म्हणणे ऐकून त्याबद्दल तिचे समुदपदेशन करण्यात येईल. तसेच तक्रारीचे स्वरूप जाणून घेऊन संबंधित जिल्ह्यातील संबंधित विभागाला या हेल्पलाइनमार्फत ई-मेल करून तातडीने माहिती देण्यात येईल. तक्रारीचे गांभीर्य लक्षात घेऊन आवश्यकता असल्यास आयोगामध्ये सुनावणीसाठीही बोलावण्यात येणार आहे. ज्या महिलेने तक्रार केली आहे, तिला तिच्या मोबाइलवर तिकिट नंबर मेसेज केला जाईल, जेणेकरून त्याबाबत पाठपुरावा करणे सोपे होईल.

# जागतिक महिला दिनानिमित्त राज्य महिला आयोगाच्या कार्यालयात झालेल्या कार्यक्रमाची क्षणचित्रे.



आयोगाच्या अध्यक्ष विजया रहाटकर, अभिनेत्री अनुराधा राजाध्यक्ष यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले.



आयोगाच्या अध्यक्ष विजया रहाटकर यांचे स्वागत करताना आयोगाच्या सदस्य सचिव डॉ. मंजूषा मोळवणे.



उद्योजिका मीनल मोहाडीकर यांचे स्वागत करताना आयोगाच्या अध्यक्ष विजया रहाटकर.



राज्य महिला आयोगाचे लेखा अधिकारी दि. ह. सावंत यांच्या हस्ते अभिनेत्री अनुराधा राजाध्यक्ष यांचे स्वागत करण्यात आले.



राज्य महिला आयोगाच्या प्रशासकीय अधिकारी आसावरी सोज्वळ यांच्या हस्ते यूएनडीपीच्या आफरिन सिद्दीकी यांचे स्वागत करण्यात आले.



राज्य महिला आयोगाच्या वतीने महिला दिनानिमित्त आयोजित करण्यात आलेला कार्यक्रम उपस्थितांसाठी संस्मरणीय अनुभव ठरला.



राज्य महिला आयोगाने प्रकाशित केलेल्या 'प्रवास सक्षमतेकडे' या पुस्तकाचे प्रकाशन करताना मान्यवर. पुण्यातील आयएलएस लॉ कॉलेजच्या डॉ. जया सागडे, डॉ. शिरीषा साठे, प्रसन्ना इनवल्ली आणि डॉ. कौस्तुभ जोग यांनी हे पुस्तक लिहिले आहे.




राज्य महिला आयोगाने प्रकाशित केलेल्या 'साद दे, साथ घे' या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. महिला आयोगाच्या प्रयत्नांमुळे मदत मिळालेल्या महिलांच्या कथा या पुस्तकात आहेत.



राज्य महिला आयोगाचे मुखपत्र 'साद' मासिकाचे प्रकाशन उपस्थितांच्या हस्ते करण्यात आले.




# हलाला, बहुपत्नीकत्वाविरोधात लढा उभारावा : विजया रहाटकर

साद प्रतिनिधी

तिहेरी तलाकविरोधात लढा उभारलेल्या महिलांना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारने साथ दिली आहेच; आता हलाला, बहुपत्नीत्व अशा कुप्रथांविरोधात मुस्लिम महिलांनी लढा उभारावा, अशी आग्रही अपेक्षा महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर यांनी नुकतीच मुंबईमध्ये व्यक्त केली.

महाराष्ट्र राज्य महिला आयोग आणि भारतीय मुस्लिम महिला आंदोलन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित तीन तलाक बिल-चर्चा और सुझाव या परिसंवादाचे आयोजन करण्यात आले होते. त्या वेळी रहाटकर बोलत होत्या. तिहेरी तलाकबाबतच्या मसुद्याबाबत चर्चा आणि सूचना याबाबत यावेळी चर्चा झाली. तिहेरी तलाक सोबतच हलाला, बहुपत्नीकत्व, मेहेर अशा अडचणींना सामोरे जाणाऱ्या महाराष्ट्रासह गुजरातमधील महिलांनी आपल्या व्यथा यावेळी मांडल्या.

तिहेरी तलाकविरोधात मोठा लढा मुस्लिम महिलांनी उभारला. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाने मुस्लिम महिलांच्या घटनात्मक अधिकारांचा विजय झाला. न्यू इंडिया साकारणाऱ्या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकार याबाबत कायदा करत आहेच, आता याबरोबरच अनिवासी भारतीय पतींकडून होणारी फसवणूक थांबविण्यासाठी केंद्र सरकार प्रयत्नशील आहे. महाराष्ट्र राज्य महिला आयोग अशा वेगवेगळ्या विषयांवर केंद्र आणि राज्य सरकारला शिफारशी करीत आहे, असे विजया रहाटकर यांनी सांगितले. तिहेरी तलाक कायद्यात अशा तलाकना पाठिंबा देणाऱ्या काझींनाही शिक्षा करण्याची तरतूद व्हायला व्हावी, असे मत या वेळी भारतीय मुस्लिम महिला आंदोलनच्या संस्थापक नूरजहाँ यांनी सांगितले. या वेळी निर्मला सामंत-प्रभावळकर, माजी सनदी अधिकारी टी. थेकेकरा, भारतीय मुस्लिम महिला आंदोलनच्या संस्थापक तसेच विविध जिल्ह्यांतील महिला प्रतिनिधी उपस्थित होत्या.



# नवी मुंबईत तरुणांसाठी निवासी कार्यशाळा

साद प्रतिनिधी




स्त्री मुक्ती संघटना आणि महाराष्ट्र राज्य महिला आयोग यांच्या वतीने नवी मुंबईतील कोपरखैरणे येथे २४ आणि २५ फेब्रुवारी रोजी युवकांसाठी विवाहपूर्व मार्गदर्शन आणि कायदेविषयक माहिती या विषयावर दोन दिवसांची निवासी कार्यशाळा घेण्यात आली.

महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या सदस्य विंदा कीर्तिकर या कार्यशाळेच्या प्रमुख अतिथी होत्या. उपलब्ध संधीचा युवकांनी योग्य वेळी उपयोग केला पाहिजे, असे सांगताना कीर्तीकर अत्यंत बोलकी उदाहरणे दिली. तसेच, महिला आयोगाच्या कार्यपद्धतीबद्दल माहिती सांगितली. तसेच संघटनेच्या अध्यक्ष ज्योती म्हापसेकर तसेच कार्यकर्त्या वृषाली मगदूम यांनी मोलाचे मार्गदर्शन केले.

महाराष्ट्र राज्य महिला आयोग यांच्याकडून स्त्री मुक्ती संघटनेला अनुदान देण्यात आले होते. स्त्री मुक्ती संघटनेतर्फे स्त्री पुरूष समानता हा संदेश समाजात रूजावा आणि लग्नसंबंधातील नातीही परस्पर पूरक निर्माण व्हावीत आणि कौटुंबिक हिंसा थांबावी या उद्देशाने युवक युवतींसाठी विवाहपूर्व मार्दगर्शन ही मोहिम राबवली जाते. महाराष्ट्र राज्य महिला आयोग यांच्या मदतीचे औचित्य साधून संघटनेच्या कोपरखैरणे केंद्रामधे वस्तीत राहणाऱ्या युवती युवकांसाठी ही कार्यशाळा घेण्यात आली.

या कार्यशाळेत सुमारे पन्नास युवक-युवतींनी सहभाग घेतला. प्रत्येक विषयावर त्यांनी मोकळेपणाने प्रश्न विचारले. मार्गदर्शकांनी त्यांच्या शंकांचे निरसन केले. समानतेच्या वाटेवर ,विवाहातील जोडीदार निवड, विवाहातील समायोजन,लैंगिकता शिक्षण, विविध कायदेविषयक माहिती, कौटुंबिक हिंसाचार विरोधी कायदा, गर्भलिंग परीक्षण प्रतिबंधक कायदा, बाललैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायदा ताणतणाव नियोजन, सार्वजनिक ठिकाणी महिलांची सुरक्षा,स्वपरिचय-स्वप्रतिमा,व्यवसाय मार्गदर्शन आदी विषयांवर माहिती देण्यात आली.



# उत्कृष्ट महिला व बालकल्याण समित्यांचा मुंबईत पार पडला सत्कार

साध प्रतिनिधी

अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था, मुंबई आणि महाराष्ट्र महापौर परिषद व नगरपरिषदा महासंघ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित राज्यातील महानगरपालिका व नगरपरिषदातील सन २०१३ - २०१४ या वर्षात उत्कृष्ट काम केलेल्या महिला व बालकल्याण समित्यांना पुरस्कार वितरण समारंभ मुंबई येथे महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर यांच्या अध्यक्षतेखाली झाला.

राज्यातील महानगरपालिका आणि नगरपरिषदामधील महिला व बाल कल्याण समित्यांनी वित्तीय अडचणी दूर करत स्तनदा मातांसाठी हिरकणी कक्ष, सार्वजनिक ठिकाणी सॅनिटरी पॅड वेंडिंग मशीन, महिलांकरिता समुपदेशन कक्ष असे धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी काम करावे असे महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर यांनी सांगितले.

महिला बाल कल्याण समित्यांनी आपल्या अधिकारांचा वापर करत केंद्र तसेच राज्य शासनाने महिलांना करिता केलेल्या योजनांची अंमलबजावणी करावी असे विजया रहाटकर म्हणाल्या. स्तनदा मातांसाठी हिरकणी कक्ष, कर्मचाऱ्यांच्या मुलांकरिता पाळणाघर, कार्यालयामध्ये तसेच सार्वजनिक ठिकाणी सॅनिटरी पॅड वेंडिंग मशीन लावणे, महिलांकरिता समुपदेशन कक्ष तसेच कामाच्या ठिकाणी लैंगिक छळापासून प्रतिबंधाकरिता असलेली अंतर्गत तक्रार निवारण समिती, कौशल्य विकासाच्या माध्यमातून महिलांना रोजगार आदी कामे प्रभावीपणे समित्यांनी करावी असे त्या म्हणाल्या. यावेळी आमदार सुनील प्रभू, मुंबई महानगरपालिकेचे महापौर विश्वनाथ महाडेश्वर, सनदी अधिकारी जयराज पाठक, महाराष्ट्र महापौर परिषदेचे कार्याध्यक्ष रणजित चव्हाण आणि राज्यातील महानगरपालिका, नगर परिषद यांचे महापौर, नगराध्यक्ष, महिला बाल कल्याण समिती अध्यक्ष सदस्य उपस्थित होते.

# वेध आत्महत्याग्रस्त कुटुंबातील महिला शेतकऱ्यांचा...

'मकाम' ही स्वयंसेवी संस्था आणि महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्यावतीने बुधवारी नागपूरमध्ये विदर्भातील शेतकरी आत्म हत्याग्रस्त कुटुंबातील महिला शेतकरयांच्या सुरक्षिततेविषयावरील चर्चासत्र झाले. आयोगाच्या अध्यक्षा मा. विजया रहाटकर यांनी त्याचे उदघाटन केले. त्यावेळी त्यांच्यासोबत नागपूरचे विभागीय आयुक्त अनुप कुमार, वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशनचे अध्यक्ष किशोर तिवारी, शेतकरी संघटनेचे विजय जावंधिया, 'मकाम'च्या सीमा कुलकर्णी, 'प्रकृती' या संस्थेच्या सचिव शोभा साखरवाडे आणि सुवर्णा दामले आदी उदघाटन सत्राला उपस्थित होते.

आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर यांनी आत्महत्या केलेल्या शेतकरयांच्या विधवांवर येणारया संकटांचा वेध घेतला. गेल्या दोन दशकांत देशात तीन लाखांहून अधिक शेतकरयांनी आत्महत्या केल्या. त्यांच्या मृत्यूपश्चात डोक्यावरील कर्ज फेडण्याची, घर चालविण्याची, मुलाबाळांचे शिक्षण करण्याची सर्व जबाबदारी त्या शेतकरयाच्या विधवेवर येते. बहुतेकवेळा संबंधित शेतजमीन त्या विधवेच्या नावाने करून देण्यास कुटुंबातील अन्य नातेवाईक विरोध करतात. त्रास देतात. आत्महत्येप्रकरणी राज्य सरकारकडून मिळालेल्या नुकसानभरपाईदेखील पूर्णपणे त्या विधवेला मिळत नाही, असे त्या म्हणाल्या. शेतकरयांच्या विधवांवर कोसळणारया या संकटांवर मात करण्यासाठी विजया रहाटकर यांनी अनेक उपाययोजना सुचविल्या. विधवा व तिच्या मुलांच्या नावाने शेतजमिनीची वाटणी व्हावी, सरकारी योजना व नोकरयांमध्ये या विधवा व त्यांच्या मुलांना प्राधान्य द्यावे, संजय गांधी निराधार योजना अधिक सक्षम करावी अशा त्या सूचना होत्या. यावेळी त्यांनी विधवांनी समाजाशी संघर्ष करीत मिळविलेल्या काही यशकथांचाही आवर्जून उल्लेख केला.

हे चर्चासत्र दोन दिवस चालले. त्यामध्ये शेतीवरील हक्क, बँकेच्या कर्जासंबंधी प्रश्न, आरोग्य उपजीविका, सरकारी योजनांचा लाभ अशा अनेक मुद्द्यांवर चर्चा झाली.



# अस्मिता योजना - माझा गौरव, माझा हक्क

इर्शाद बागवान

मुली आणि महिलांना स्वस्तात सॅनिटरी नॅपकीन उपलब्ध होणे गरजेचे आहे. यासाठीच ग्रामविकास विभागामार्फत अस्मिता योजना जाहीर करण्यात आली आहे. ग्रामीण भागातील किशोरवयीन मुलींना फक्त ५ रुपयांमध्ये ८ सॅनिटरी नॅपकीन देण्याची योजना ग्रामविकास विभागांतर्गत उमेद अभियानामार्फत राबविली जात आहे. महिला दिनापासून म्हणजे ८ मार्चपासून अस्मिता योजना सुरू झाली आहे.

ग्रामीण भागातील फक्त १७ टक्के महिला मासिक पाळीच्या वेळी सॅनिटरी नॅपकीनचा वापर करतात. उर्वरीत महिलांना सॅनिटरी नॅपकीनच्या वापराअभावी विविध आरोग्यविषयक समस्यांना तोंड द्यावे लागते. मासिक पाळीविषयी समाजात असलेले अनेक गैरसमज दूर करणे गरजेचे आहेत. तसेच मुली आणि महिलांना स्वस्तात सॅनिटरी नॅपकीन उपलब्ध होणे गरजेचे आहे. यासाठीच ग्रामविकास विभागामार्फत अस्मिता योजना जाहीर करण्यात आली आहे. ग्रामीण भागातील किशोरवयीन मुलींना फक्त ५ रुपयांमध्ये ८ सॅनिटरी नॅपकीन देण्याची योजना ग्रामविकास विभागांतर्गत उमेद अभियानामार्फत राबविली जात आहे. महिला दिनापासून म्हणजे ८ मार्चपासून अस्मिता योजना सुरू झाली आहे.

पहिल्या टप्प्यात ७ लाख मुलींना मिळणार अस्मिता कार्ड

अस्मिता योजनेतून जिल्हा परिषद शाळांमधील ११ ते १९ वयोगटातील किशोरवयीन मुलींना २४० मिलिमीटरच्या ८ पॅडचे एक पाकीट ५ रुपयांमध्ये उपलब्ध करून देण्यात येत आहे. त्यासाठी किशोरवयीन मुलींची आपले सरकार सेवा केंद्रांमार्फत नोंदणी करून त्यांना अस्मिता कार्ड देण्यात येईल. अस्मिता कार्डधारक किशोरवयीन मुलगी बचत गटांकडून सॅनिटरी नॅपकीन खरेदी करतील. पहिल्या टप्प्यात राज्यातील साधारण ७ लाख





मुलींना अस्मिता कार्ड देण्यात येणार आहेत. अस्मिता कार्डधारक किशोरवयीन मुलींना ५ रुपयांप्रमाणे विक्री केलेल्या पॅकेटच्या संख्येच्या प्रमाणात प्रती पॅकेट १५.२० रुपयांप्रमाणे अनुदान शासन बचतगटांना देणार आहे. किशोरवयीन मुलींना वर्षभरात १३ पाकीटे उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.

या योजनेच्या अंमलबजावणीसाठी मोबाईल ॲप तयार करण्यात आले असून, नुकतेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि ग्रामविकास मंत्री पंकजा मुंडे यांच्या हस्ते त्याचे अनावरण करण्यात आले. या पच्या माध्यमातून महिला बचतगट हे सॅनिटरी नॅपकीनची मागणी ऑनलाइन नोंदवतील. नोंदवलेल्या मागणीनुसार वितरक त्यांना पुरवठा करतील. या योजनेचा लोगो आणि डिजिटल अस्मिता कार्ड यांचेही अनावरण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आणि ग्रामविकास मंत्री पंकजा मुंडे यांच्या उपस्थितीत मंत्रालयात करण्यात आले. प, अस्मिता कार्ड, वेबपोर्टल हे येस बँक, माहाऑनलाईन व केपीएमजी यांच्या सहाय्याने तयार करण्यात आले.

### महिलांनाही मिळणार माफक दरात सॅनिटरी पॅड

अस्मिता योजनेतून ग्रामीण भागातील महिलांनाही माफक दरात सॅनिटरी नॅपकीन उपलब्ध करुन देण्यात येणार आहेत. महिलांना २४० मिमीच्या ८ पॅडचे एक पाकीट २४ रुपयांना तर २८० मिमीच्या ८ पॅडचे एक पाकीट २९ रुपयांना उपलब्ध होणार आहे. बचतगट हे वितरकांकडून सॅनिटरी नॅपकीनचे पाकीट खरेदी करुन परस्पर विक्री करणार आहेत.

**(लेखक विभागीय माहिती अधिकारी आहेत.)**

### मुख्यमंत्री, रहाटकर बनले अस्मिता प्रायोजक

अस्मिता फंडाचा मुख्यमंत्र्यांच्या हस्ते शुभारंभ करण्यात आला आहे. https://mahaasmita.mahaonline.gov.in/ या वेबपोर्टलद्वारे ग्रामीण भागातील मुली व महिलांना सॅनिटरी नॅपकीन उपलब्ध होण्यासाठी लोक अस्मिता स्पॉन्सर (अस्मिता प्रायोजक) होऊ शकतील. या निधीतून ग्रामीण भागातील मुलींना सॅनिटरी नॅपकीन मिळण्यासाठी लोकसहभागातून मोठी मदत उपलब्ध होणार आहे. मुख्यमंत्र्यांनी अस्मिता फंडाचा प्रारंभ करताना ५० मुलींना १२ महिने सॅनिटरी नॅपकीन उपलब्ध करून देण्यासाठी ऑनलाइन रक्कम वर्ग करून या ५० मुलींची अस्मिता प्रायोजकत्व स्वीकारले. अस्मिता प्रायोजकत्व स्वीकारणारे मुख्यमंत्री फडणवीस हे पहिले ठरले. आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर यांनी ५१ मुलींना १२ महिने सॅनिटरी नॅपकीन उपलब्ध करण्यासाठी ऑनलाइन रक्कम वर्ग करून या ५१ मुलींचे प्रायोजकत्व स्वीकारले.

### अस्मिता योजनेची प्रभावी अंमलबजावणी करू – मंत्री पंकजा मुंडे

या संदर्भात बोलताना मंत्री पंकजा मुंडे म्हणाल्या, मोबाईल ॲप, डिजिटल अस्मिता कार्ड यांच्या माध्यमातून अस्मिता योजनेत पूर्ण पारदर्शकता राखली जाणार आहे. योजनेची राज्यात प्रभावी अंमलबजावणी केली जाईल. अस्मिता फंडासाठी https://mahaasmita.mahaonline.gov.in/ या वेबपोर्टलवर sponsor online या मेनूवर जाऊन लोक मुलींच्या सॅनिटरी नॅपकीनसाठी अस्मिता प्रायोजक होऊ शकतील. लोकांनी अस्मिता निधीला सहकार्य करून अस्मिता प्रायोजक व्हावे, असे आवाहन मंत्री पंकजा मुंडे यांनी केले आहे.

# महाराष्ट्राचा अर्थसंकल्प...
# मार्ग समृद्धीचा...



**राज्य सरकार नेहमीच वेगवेगळ्या योजना करीत असतंच. पण लक्षात घेण्यासारख्या यातल्या काही योजना म्हणजे फलोत्पादनाला मिळालेलं प्रोत्साहन. शिवाय सेंद्रिय शेतीआणि वनशेतीला दिलेलं प्रोत्साहन हेही स्तुत्य आहे. कारण शेतीच्या फलोत्पादन, सेंद्रिय शेती आणि काही प्रमाणात वनशेतीसुद्धा या प्रकारांवर पक्कड आली तर त्यात शेतीतून मिळणाऱ्या उत्पन्नात भरीव वाढ शक्य आहे. राज्याचे अर्थमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी नुकत्याच मांडलेल्या अर्थसंकल्पाचा हा लेखाजोखा...**


## सीए अजित जोशी
meeajitgmail.com


**आशा नाम मनुष्याणां काचिदाश्चर्यशृङ्खला ।**
**यया बद्धा: प्राधावन्ति मुक्तास्तिष्ठन्ति पङ्गुवत् ।**

असं एक संस्कृत सुभाषित आहे. आशा ही मनुष्याला बांधणारी अशी एक आश्चर्यकारक साखळी आहे कि हिने बांधलेला धावत सुटतो आणि हिच्यापासून मुक्त झालेला मात्र पांगळ्यासारखा पडून राहतो, असा त्याचा मुक्तानुवाद करता येईल. दिनांक ९ मार्चला सादर झालेल्या महाराष्ट्र सरकारच्या अर्थसंकल्पामध्ये हीच महत्त्वाची प्रेरणा आहे. आजच्या जमान्यात अर्थसंकल्पातून सरकार जनतेला थेट उत्पन्न देत नसतं, ते व्यवहार्यही नाही.

मात्र अशा अनेक योजना जाहीर होत असतात. या योजना म्हणजे एका प्रकाराने सरकारने आपल्याला आपल्या उन्नतीसाठी दाखवलेली आशाच असते आणि तिच्या जोरावरच आपण दमदारपणे मजल मारू शकतो. आपण सर्वांनीच एका आशावादी आणि उत्साही मनोवृत्तीतून या घोषणांचा फायदा घ्यायला हवा आणि त्यातून येणाऱ्या वर्षात निश्चितपणे प्रगती शक्य होईल.

कोणत्याही अर्थसंकल्पात काही क्षेत्रांसाठी घोषणा आणि तरतुदी होणं महत्त्वपूर्णच नव्हे, तर अत्यावश्यकही असतं. त्यानुसार रस्ते, उर्जा, ग्रामसडक, वीजनिर्मिती, महानगरातले मेट्रोसारखे पायाभूत प्रकल्प, जलसिंचन, सामाजिक न्याय, घरनिर्मिती, सांडपाणी प्रक्रिया अश्या असंख्य खात्यांना आणि त्यातल्या

# दृष्टिक्षेपात अर्थसंकल्प

## कृषी

- शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्याच्या दृष्टीने सरकार प्रयत्नशील.
- शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्याच्या धोरणाला अनुसरून उत्पादन खर्च मर्यादित राहील या उद्देशाने सेंद्रिय शेती-विषमुक्त शेतीला प्रोत्साहन देण्याचा निर्णय. या स्वतंत्र योजनेसाठी १०० कोटी रुपयांचा निधी.
- शेतकऱ्यांना पीक व पशुधन याबरोबर उत्पन्नाचा नवीन स्रोत म्हणून वनशेतीस प्रोत्साहन देण्याचा निर्णय. त्यासाठी १५ कोटी रुपयांचा निधी प्रस्तावित.
- राज्यातील ९३ हजार ३२२ कृषी पंपांना विद्युत जोडणी देण्यासाठी ७५० कोटी रुपयांच्या निधीची तरतूद.

## सिंचन

- प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेअंतर्गत समाविष्ट असलेल्या राज्यातील २६ प्रकल्पांकरिता ३ हजार ११५ कोटी २१ लाख रुपये निधीची तरतूद.
- 'जलसंपदा'साठी ८ हजार २३३ कोटी १२ लाख रुपयांची तरतूद.
- जलयुक्त शिवार अभियानासाठी १५०० कोटी रुपये विशेष निधी.
- मागेल त्याला शेततळे योजनेत ६२ हजार शेततळी पूर्ण. त्यासाठी १६० कोटी रुपये एवढा निधी.

## पर्यावरण

- समुद्र किनाऱ्यांच्या संवर्धनासाठी व जमिनीची धूप थांबविण्यासाठी जागतिक बँकेच्या सहाय्याने मोठा प्रकल्प राबविणार.
- अकोला शहरातील मोरणा नदी स्वच्छता मोहिमेला मदतीचा हात देण्याचा निर्णय, राज्यातील जल स्रोतांच्या स्वच्छता व सौंदर्यीकरणाच्या योजनेसाठी २७ कोटी रुपये निधीची तरतूद.
- सागरी क्षेत्रातील विकासकामांचे नियमन व तटवर्ती क्षेत्रांतील लोकांची पारंपरिक उपजीविका वाढविणे व क्षेत्र व्यवस्थापन ह्या प्रकल्पासाठी ९ कोटी ४० लाख रुपये निधीची तरतूद.
- नागपुरातील गोरेवाडा प्राणी संग्रहालयासाठी २० कोटी रुपये निधी.

## सामाजिक

- विमुक्त जाती, भटक्या जमाती व इतर मागासवर्गीयांचे कल्याण या विभागाकरिता १ हजार ८७५ कोटी ९७ लाख रुपये निधीची तरतूद.
- थोर पुरुषांचे साहित्य वेब पोर्टलद्वारे प्रकाशित करण्याचा निर्णय, यासाठी चार कोटींची तरतूद.
- श्री चक्रधर स्वामी यांच्या नावाने राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात अध्यासन केंद्र निर्माण करणार.

## रस्ते आणि परिवहन

- महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन मंडळामार्फत मालवाहतुकीची नवीन सेवा सुरू करण्याचा निर्णय.
- मुंबई उपनगरी रेल्वे सेवांमध्ये सुधारणेसाठी मुंबई नागरी परिवहन प्रकल्प टप्पा ३ साठी भरीव तरतूद.
- मुंबई, पुणे व नागपूर मेट्रोच्या विकासासाठी भरीव तरतूद.
- समृद्धी महामार्ग प्रकल्पाचे काम एप्रिल २०१८ सुरू होणार. प्रकल्प ३० महिन्यांच्या अवधीत पूर्ण करण्याचे नियोजन.

## व्यवसाय-रोजगारनिर्मिती

- रेशीम उद्योग विकासातून रोजगार निर्मितीच्या दृष्टीने तीन कोटी रुपयांचा निधी प्रस्तावित.
- रोजगाराच्या संधी निर्माण करण्यासाठी नावीन्यपूर्ण स्टार्ट अप धोरण राबविण्याचा निर्णय. पाच लाख रोजगार व स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करण्याचे लक्ष्य.

## शैक्षणिक

- आंतरराष्ट्रीय शैक्षणिक दर्जाच्या १०० शाळा निर्माण करणार. तसेच महाराष्ट्र आंतरराष्ट्रीय शिक्षण मंडळ (एमआयईबी) स्थापन करणार.
- केंद्रीय लोकसेवा आयोगातील सेवांमध्ये राज्यातील उमेदवारांचे प्रमाण वाढवण्यासाठी भारतीय प्रशासकीय सेवा पूर्व प्रशिक्षण केंद्राच्या बळकटीकरणाचा निर्णय, विद्यार्थ्यांच्या विद्या वेतनात दोन हजार रुपयांवरून चार हजार रुपये इतकी वाढ प्रस्तावित.
- अमरावती येथील भारतीय प्रशासकीय सेवा पूर्व प्रशिक्षण केंद्राच्या प्रशासकीय इमारतीच्या व वसतिगृहाच्या बांधकामासाठी १३ कोटी रुपये निधीची तरतूद.

## ऊर्जा

- ऊर्जा विभागाच्या पायाभूत सुविधा व अन्य बाबींकरिता ७ हजार २३५ कोटी रुपये निधीची तरतूद.
- पायाभूत आराखडा दोन योजनेअंतर्गत वितरण प्रणाली सुधारण्यासाठी महावितरण कंपनीकरिता शासनाच्या भाग भांडवलापोटी ३६५ कोटी ५५ लाख रुपये निधीची तरतूद.
- नवीन व नवीकरणीय ऊर्जा स्रोताच्या विकासासाठी ७७४ कोटी ५३ लाख रुपये निधीची तरतूद.



लोकोपयोगी योजनांना भक्कम आर्थिक पाठबळ उभं करण्याचा प्रयत्न सरकारने केलेला आहेच. मात्र निव्वळ सगळ्या आर्थिक तरतुदींची यादी पाहण्यापेक्षा अश्या कोणत्या वेगळ्या गोष्टी आहेत ज्यांचा फायदा घेऊन आपण आपला विकास करू शकतो, ही आशा निर्माण होते? त्याचा परामर्श आपण इथे घेतलेला आहे. यात एक सर्वात महत्त्वाचा घटक शिक्षणाचा आहे. महाराष्ट्रात स्त्रियांच्या शिक्षणाचं प्रमाण मुळातच आशादायी आहे आणि त्यातही २०१६-१७ मध्ये १८ ते २३वयोगटातल्या शिक्षणातल्या समानतेचं गुणोत्तर (Gender Parity Index) हे ०.८५/०.८६ पासून वाढून ०.८८ वर गेलेलं आहे, हे आशादायीच आहे. परंतु स्त्रियांना शिक्षणाची आस दुपदरी असते. कोणत्याही घरामध्ये सहसा येणाऱ्या पिढीच्या शिक्षणाबद्दल महिलाच जास्त जागरूक असते. त्यादृष्टीने जिल्हास्तरावर स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र हा एक महत्त्वाचा निर्णय आहे. रोजगाराच्या संधी देशाप्रम णेच देशाबाहेर अधिकाधिक निर्माण होत आहेत. त्याबद्दल अनेकांना आकर्षण असतं. परदेशात शिक्षणासाठी जाऊ इच्छीनाऱ्या युवक-युवतींना परदेश रोजगार आणि कौशल्य विकास केंद्र स्थापन करण्याचा निर्णय हा त्यादृष्टीने फारच आगळावेगळा आणि अभिनव म्हणावा लागेल. या केंद्रांची माहिती मिळवून जास्तीत जास्त तरुणाईने त्याचा फायदा घ्यायला हवा. या सगळ्याबरोबरच देशातल्या देशात रोजगाराच्या संधी हव्या असतील तर कौशल्यविकासाच्या प्रोत्साहनाला पर्याय नाही. तेव्हा ६ कौशल्यविकास विद्यापीठांची स्थापना, हा त्यातला मोलाचा प्रयोग ठरू शकेल. सर्वात महत्त्वाची घोषणा म्हणजे आंतरराष्ट्रीय शाळांच्या संलाग्नेसाठी महाराष्ट्र आंतरराष्ट्रीय शिक्षण मंडळाची स्थापना, हा राज्यातल्या शिक्षणातला एक मैलाचा दगड म्हणायला हवा. आजही राज्यात जी वेगवेगळी शिक्षण मंडळ कार्यरत आहेत, त्यामुळे होणारा गोंधळ यातून सकारात्मकतेने निस्तरू शकेल.

शेतीसाठी सरकार नेहमीच वेगवेगळ्या योजना आणि प्रबंध करीत असतंच. पण लक्षात घेण्यासारख्या यातल्या काही योजना म्हणजे फलोत्पादनाला मिळालेलं प्रोत्साहन. कोकणाव्यतिरिक्त उर्वरित महाराष्ट्रातही या योजनेचा लाभ ६ हेक्टरपर्यंतच्या शेतजमिनींना दिलेला आहे. शिवाय सेंद्रिय शेतीआणि वनशेतीला दिलेलं प्रोत्साहन हेही स्तुत्य आहे. कारण शेतीच्या फलोत्पादन, सेंद्रिय शेती आणि काही प्रमाणात वनशेतीसुद्धा या प्रकारांवर पक्कड आली तर त्यात शेतीतून मिळणाऱ्या उत्पन्नात भरीव वाढ शक्य आहे. त्यामुळे काहीश्या अपरंपरागत अश्या शेतीच्या या वाटा आपण जोमाने चोखाळायला हव्या. शिवाय आपल्या लाडक्या एसटीच्या माध्यमातून शेतमाल वाहतूक, हाही एक दूरगामी उपयोगी ठरेल असा निर्णय आहे. गेल्या अंकात आपण केंद्र सरकारने वाजतगाजत घोषित केलेल्या सर्वांसाठीच्या विमा योजनेचा उहापोह केलेला होता. राज्य सरकारनेही राष्ट्रीय आरोग्य अभियानासाठी ९६४ कोटी रुपये घोषित करून त्यात भरीव सहभाग घेतलेला आहे. शिवाय महात्मा फुले जनआरोग्ययोजनेसाठीची ५७६ कोटी रुपयांची तरतूद, हीही एकून आरोग्याच्या दृष्टीने मोलाची ठरेल. जीडीपी अर्थात एकूण उत्पनाच्या वाढीच्या दराची नेहमीच चर्चा होते. मात्र मानवी विकासाचा निर्देशान वाढावा यासाठी तो कमी असलेल्या ४ जिल्ह्यात विशेष तरतूद होणे, हे दृष्टीकोन म्हणून महत्त्वाचं ठरू शकतं.

आर्थिक विकास हा शेतीप्रमाणेच उद्योगांवरही अवलंबून असतो. यात वस्त्रोद्योगासारख्या पारंपारिक उद्योगांसाठी योजना आहेत, त्याचप्रमाणे व्यवसाय करण्याच्या सुलाभिकार्णावर भर दिलेला आहे. एक दखल घेण्याजोगा प्रयोग म्हणजे मुंबईमध्ये वित्ततंत्रज्ञानकेंद्र अर्थात फिन्टेक हबची स्थापना करून ज्याना सहज भांडवल मिळत नाही त्यांना तंत्रज्ञानाच्या मदतीने सामायिक सोयीसुविधा मिळाव्या म्हणून भांडवली साहाय्य मिळेल, ही आशादायी घोषणा आहे. याचबरोबर लॉजीस्टिक पार्क, हाही एक उद्योगातल्या एका महत्त्वाच्या क्षेत्राला हात घालण्याचा योग्य असा प्रयत्न आहे. महिलांसाठीची आवर्जून दखल घेण्याजोगी बाब म्हणजे पुढच्या पाच वर्षात महिला उद्योजकांची संख्या ९ टक्क्यांवरून २० टक्क्यांवर जावी असा प्रयत्न आहे. तेव्हा सामान्य महिलांनीही यात धडाडीने सहभाग घेणं, हे गरजेचं आहे. शिवाय स्टार्टअप्स हे येणाऱ्या काळातल्या उद्योजकतेचं इंजिन आहे. तेव्हा पुढच्या पाच वर्षात ५००० कोटींची गुंतवणूक त्यात व्हावी आणि १०००० नवे स्टार्टअप्स सुरु व्हावे अशी महत्त्वाकांक्षी उद्दिष्ट सरकारने ठेवलेली आहेत, ती साध्य करायची, तर आपण सर्वांनीच जोरात कामाल लागायला हवं. त्यातही विशेषत्त्वाने एरोस्पेस आणि संरक्षण क्षेत्राशी संबंधित कौशल्याविकास आणि संशोधनातून विकसित होणारी पेटंटस यासाठी केलेली तरतूद आगळीवेगळी म्हणायला हवी. या सगळ्यासोबतच पारंपारिक पण तुलनेने थोडेसे उपेक्षित असलेले आणि आता नव्याने संधी उपलब्ध होत असलेले काही उद्योग म्हणजे काथ्या, हस्तकला, मातीकला असे उद्योग! सरकारने या प्रत्येक उद्योगासाठी काहीनकाही तरतूद आणि योजना आणलेली आहे, ज्यातून उद्योजकतेचा झरा खालपर्यंत झिरपत जाण्याची आशा आहे. जातां जातां एका गोष्टीचा आवर्जून उल्लेख करायला हवा. अर्थसंकल्प सादर व्हायच्या अवघ्या एक दिवस आधी महाराष्ट्र राज्य महिला आयोगाने पिडीत महिलांना समुपदेशन व्हावं म्हणून 'सुहिता' ही हेल्पलाईन सुरू केली. योगायोगाने दुसऱ्याच दिवशी अर्थसंकल्पात शासकीय योजनांची माहिती स्वतःहून जनतेला करून घेता यावी या करता टोल फ्री नंबरवरून लोकसंवाद सुरु करण्याची घोषणा झाली. एका अर्थाने महिला आयोगाने दाखवलेल्या दिशेनेच राज्य सरकारचं हे पाउल आहे, असं म्हणायला हवं. आणि ही खरोखरच आयोगासाठी अभिमानाची आणि तशीच जबाबदारीची बाब आहे.



# अन्याय सहन करू नका, कायद्याची मदत घ्या

- महिला आयोग सदैव आपल्या पाठीशी आहे.
- कामाच्या ठिकाणी महिलांचा होणारा लैंगिक छळापासून प्रतिबंध/ मनाई/ निवारण कायदा, २०१३ नुसार कामाच्या ठिकाणी म हिलांना सुरक्षितता आहे.
- कौटुंबिक हिंसाचार कायदा,२००५ अन्वये महिलांना संरक्षण, निवारा, मुलांचा हक्क/ नुकसान भरपाई/पोटगी या कायद्यान्वये मागू शकतात.
- गर्भधारणापूव व प्रसूतीपूर्व निदान तंत्र अधिनियम १९९४ या कायद्याने लिंग निवडीबाबत प्रतिबंध करण्यात आला आहे.
- सायबर क्राईम अधिनियम २०१५ अन्वये अश्लील मजकूर इलेक्ट्रॉनिक स्वरूपात प्रसिद्ध करणे, महिती काढणे कायद्याने गुन्हा आहे.
- अनैतिक व्यापार प्रतिबंधक कायदा, १९५६ अन्वये महिलांची तस्करी करणे कायद्याने गुन्हा आहे.
- लैंगिक गुन्ह्यांपासून बालकांचे संरक्षण कायदा २०१२ (**POCSO**) अन्वये अल्पवयीन बालकांवरील अत्याचारास प्रतिबंध करण्यात आला आहे.

## साद-प्रतिसाद

प्रिय वाचक,
साद अंकाविषयी आपल्या प्रतिक्रियांची आम्ही वाट पाहत आहोत. त्याच बरोबर आपल्या समस्यांविषयी मार्गदर्शन हवे असल्यास आपण 'साद'शी संपर्क साधू शकता. आपल्या समस्या खालील मेलवर लिहून पाठवा.
saad.mscw@gmail.com

रौप्य महोत्सवी वर्ष २०१८

// स्त्रीशक्तिरतुल्या सदा //

**महाराष्ट्र राज्य महिला आयोग, मुंबई**
गृहनिर्माण भवन म्हाडा बिल्डिंग,
कलानगर, वांद्रे (पू.), मुंबई ४०००५१
दूरध्वनी : ०२२ - २६५९०८७८
mscwmahilaayog@gmail.com



# राजकारण बदलाया, राजकारणात या!

गेल्या २५ वर्षांतील या नव्या राज्यकर्तींची काम गिरी खूपच आशादायक आहे. म्हणून तर स्तानिक स्वराज्य संस्थांमध्ये ५० टक्के आरक्षण मिळाले! शिवाय उच्च सभागृहातही ३३ टक्के आरक्षण मिळेल, अशी खात्री निर्माण झाली आहे. परंतु महिलांचे कर्तृत्व हे पुरुषी नेतृत्वाला पटायला व पचायला थोडा वेळ लागेल

**भीम रासकर**
राज्य समिती सदस्य, महिला राजसत्ता आंदोलन

आठ मार्च या जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने एक प्रतिज्ञा करण्याची गरज आहे. महिलांनी राजकारणात जाऊन समाजातील सर्व वर्चस्वाच्या बेड्या झुगारुन दिल्या पाहिजेत. अनिष्ट परंपरा, पुरुषीपणाचे वर्चस्व, जातीचे थैमान, धर्म-अंधश्रद्धेचा बागुलबुवा, निवडणूकीत पैशांचा पाऊस, माध्यमांचा हैदोस आणि कंपनीकरणाचा लोकशाहीवर कब्जा व पक्षांनी महिलांना सर्व स्तरावर दिलेले दुय्यम स्थान या सर्व बाबींवर मात करण्यासाठी महिला सर्व व्यापक राजकारणात व निर्णय प्रक्रियेत प्रभावीपणे उतरले पाहिजे.

महिला राजकारणात आली, तिला आरक्षण दिले, मग तिने परिवर्तनाची जादू करावी, पाच वर्षांत गावाचा कायापालट करावा, अशा चमत्कारी अपेक्षा आता खूप वाढल्या आहेत. तसेच तिला राजकारण व अर्थसंकल्प कळत नाही, तिचे शिक्षण फार नाही. तिने आमदार-खासदारांचे तोंडही पाहिलेले नाही, म्हणजे आता गावाचे वाटोळे होणार, असे आजही बोलले जाते. याला आम्ही गेल्या ५० वर्षांतं

गावाचे काय झाले, असा प्रश्न विचारायचो. दलित व महिला बजेट अरक्षित आहे, ते वापरा असा प्रचार या महिला राज्यकर्त्यांमध्ये करायचो. त्यातून महिलांनी बरीच कामे सुरू केली. आम्ही हिशेब दाखवा अभियान' आम्ही सुरू केले. त्यामुळे त्यांना गावाची साथ मिळाली. ऋताठ मान - ताठ कणा, कारभारणींचा खरा दागिना' ही घोषणा महिलांना आवडू लागली. यातून महिलांचा मतदारसंघ पक्का करण्याची संधी मिळू लागली. ऋबचत सत्ता ते राजसत्ता' या कार्यक्रमाला माविमंसारख्या निमशासकीय महामंडळानेही हातभार लावला.

भारतात पहिल्यांदा  ऋमहिला सभे'चे परिपत्रक राज्य सरकारनने प्रसिद्ध केले. या सभेच्या रूपाने गावातील महिला संघटना बनवायला आम्ही कायद्याची मदत झाली. महिलांमध्येही हेवेदावे, उच्च-नीचता, भेदभाव आहेच ना? त्यावर ऋआम्ही सख्ख्या नाही, पण पक्क्या बहिणी' या घोषणेचे प्रशिक्षण झाले. दलित महिला रस्त्यावर यायच्या. मराठा महिला निवेदने लिहायच्या आणि गाणी म्हणायला आंबेडकरी जलसे पुढे यायचे. प्रत्येकाचे योगदान हे या नव्या राज्यकर्तींचे काम व विश्वास वाढायला मदत करायचे. कारभार शिकण्याची ऊर्जा मात्र सर्व महिलांमध्ये प्रचंड असायची. एकदा आम्ही असेही पाहिले की, पंचायतराज प्रशिक्षणाचे चार्ट रात्र...रात्र जागून महिला आपल्या वहीत टिपून घ्यायच्या. त्यांची ही ऊर्मी आम्हालाही खूप ऊर्जा देऊन जाते. चोवीस तासांच्या आत मंत्रालयाच्या शिष्टमंडळात मुंबईला येऊ शकणाऱ्या अनेक जणी जय्यत तयार आहेत. महाराष्ट्रातील तेहतीस टक्के महिला आरक्षणानेच महिलांना पन्नास टक्के आरक्षण देण्याचा विश्वास कमावला! त्यांचे श्रेय राज्यकर्त्यांसोबत या राज्यकर्तींनाही जाते. आय. ए. एस. अधिकाऱ्यांच्या प्रशिक्षणाची जशी सोय आहे, तशीच सोय या महिलांसाठीही केली तर ऋराजकारणाचा पोत' बदलायला खूप मदत होईल. नव्या राज्यकर्तींचे हे योगदान ऋराजकारण बदलाया- राजकारणात या' या घोषणेला पूरक होईल.

महिला आरक्षण हा त्यांच्या अधिकार आहे, असे वातावरण व मन तयार व्हायला वेळ आहे; परंतु आजपर्यंतची गुंतवणूक व ऋकर्मा'चे फळ मिळालेच पाहिजे, हा प्रस्थापित सत्ताधाऱ्यांचा विचार पक्का झालेला आहे. मात्र या महिला निवडून येण्याअगोदर उमेदवारी ठरविण्यातही त्या शंभर टक्के नसतात. त्यांच्या कामातून व प्रेरणेतून त्या निवडणुकीत उभ्या राहिल्या तर चित्र खूपच वेगळं व आशादायी असू शकेल; परंतु ऋपडेल मतदारसंघ' म्हणजे ऋताईंचा मतदारसंघ'- हे सूत्र पुढाऱ्यानी शोधलं. आरक्षण लागू झाल्यावर ऋयशाची खात्री' हा निकष पक्षासाठी खूप महत्त्वाचा असतो. सभागृहात आपली मागणी लावून धरायची तर बहुसंख्यांची गरज असते. त्यामुळे नव्यानं तिकीट मागणाऱ्या स्त्रिया वॉर्डात काम छान करीत असतील; परंतु त्यांच्याकडे निवडणुक जिंकण्याचं ऋमेरिट' नसेल तर पक्ष अशी तसदी घेऊ इच्छित नाही.

गेल्या २५ वर्षांतील या नव्या राज्यकर्तींची कामगिरी खूपच आशादायक आहे. म्हणून तर स्तानिक स्वराज्य संस्थांमध्ये ५० टक्के आरक्षण मिळाले! शिवाय उच्च सभागृहातही ३३ टक्के आरक्षण मिळेल, अशी खात्री निर्माण झाली आहे. परंतु महिलांचे कर्तृत्व हे पुरुषी नेतृत्वाला पटायला व पचायला थोडा वेळ लागेल हे खरे! महिला राजसत्तेत आल्याबरोबर त्यांनी भर्रकन जादूची कांडी फिरवून मागचा सर्व विनाश नष्ट करावा- हे कसे शक्य आहे? ती विकासाचा अजेंडाच पुढे घेऊन जातेय हे सांगायला आता कुणा संशोधकाची गरज नाही. परंतु महिलांनी जातीचेही राजकारण करावे, पैशातही खेळावे, पक्षालाही पूर्ण बांधून घ्यावे, गरीब वर्गाचा झेंडा खांद्यावर घ्यावा व  मग विकासाला वेळ द्यावा किंवा महिला प्रश्नाला वाचा फोडावी, या अपेक्षांचा निर्णायक धनीही पुन्हा सत्ताधारी पुरुषी विचाराचा वर्गच आहे. दोन पोरांना अर्धी अर्धी भाकरी वाटून उपाशी पोटी झोपणारी माय, सत्तेत येतेय तर त्यांचं स्वागत का करु नये?

जागतिक महिला दिनी हक्कासाठी लढणाऱ्या स्त्रियांच्या अन्यायाला शब्दरुप मिळाले, त्याच्या शोषणाला वाचा फुटली, तशी  महिलांच्या सत्ताकारणालाही समाजमान्यता प्राप्त होण्याची गरज आहे.

स्त्रियांनी राजकारणात यावं म्हणून काय करावं? जशी घरात बाई दुय्यम, तशी पक्ष महिला आघाडीतही दुय्यम- हे कसे व कोण थोपवणार? महिला आघाडीला महिलांबाबतच्या निर्णयात तरी पक्ष विचारात घेतो का? निवडणूकीत





तिकीट वाटप व वित्त निर्णय यंत्रणा यात पक्ष पातळीवर महिलांचं  स्थान काय? पक्ष फंड जमवायची कला नसली तर तिने पक्ष निर्णयात येऊच नये का? आजही कार्यकर्ती व गर्दी जमविणारी ही वाघीण सत्तेत यायला तिचा पदर डोक्यावर ठेवून व आरतीचं ताट घेऊन ओवाळायला यावी अशीच अपेक्षा  असते. सरंजामी चाबूक अजूनही दिसत नसला तरी ऋअग, ऐ ऐकलं का?' किंवा ऋव्हय बाजूला, तुला काय कळतंय्?' अशा सुरात हा अदृश्य चाबूक आवाज काढतच असतो. प्रस्थापित पक्षातील पुढारी सत्तेचे नाव काढले की, आपोआप खुर्चीवर टेकून त्यांचे फर्मान जाते, ऋऋमी सांगेल तसं करायचं, समजलं नाही तर गप्प बसून राहायचं. ज्ञान किंवा अज्ञान काहीच दाखवायचं नाही.'' सर्वात जास्त बाहुल्या या मनोवृत्तीनेच घडविल्या. जेवढे पक्ष, तेवढ्या तऱ्हा!

थोडक्यात, रणधुमाळीची तयारी व फुफाटा उधळायला सुरुवात झाली. दीड लाख महिला स्थानिक स्वराज्य संस्थेत फक्त गप्प बसून राहतील काय? किंवा त्या फक्त गप्पा मारणार काय? नाही! त्यांना समाजाचं शहाणपण व पक्षाचे संरक्षण मिळाले तर त्या राजकारणाचा पोत बदलायला नक्की धजावतील. राजकारणाची बदनामी थांबवायची तर महिलांची भागीदारी ही पुरुषांनी हिमतीने स्वीकारली पाहिजे. पक्षांनीही त्यांना निर्णयात घ्यावे. राजकारणातील महिलांची भागीदारी धारदार व्हायची तर पक्ष तिकिट कमिट्यांमध्ये त्यांना घेतलेच पाहिजे. तसेच पक्के वॉर्ड त्यांना देऊन जिंकल्यानंतर त्यांच्या कारभारात मदतीच्या नावाखाली मालकी दाखविता कामा नये. घरात मालक म्हणवत असले तरी कारभारात मालकी बंद झाली पाहिजे. त्यासाठी शिक्षित महिला व युवतींनीही राजकारणात यावे म्हणून राजकारणाची गोडी घराघरांत वाढायला हवी. राजकारण म्हणजे भविष्याचं तारण हे पटले पाहिजे. घराघरांत राजकारणाबद्दल गोडी तयार झाल्याशिवाय हा देश प्रगतिपथावर जाणार नाही.

गप्पांचे विषय जसे घरगुती असतात, तसेच तरुण पिढी व महिलांनी राजकीय विषयदेखील बोलले पाहिजेत. स्वतः एक तरी सत्ता केंद्र ताब्यात घेऊन गरिबांचा मुद्दा लावून धरणारी ती ऋऋसत्ताधारी'' बनायला पाहिजे. आपल्याला राजकारणात जे जम णार नाही असे वाटते, ते महिलांनी करुन पाहिले पाहिजे. पहिल्यांदा घोड्यावर बसताना, एखादी जखम होईल, पडापडी होईल, परंतु सवय झाली की घोडा नक्की ताब्यात येईल. निवडणुकांत मतदारांचीही परीक्षाच असते. एकदा कमवा व पाच वर्ष अश्रू जमवा- हे आता चालणार नाही. महिलांनी विकासाचा विडा उचलला आहे. मतदारांनीही काय करायचं, पक्ष व संघटनांनी त्यांची ताकद कशी वाढवायची हे खरे आव्हान आहे!

'राजकारण बदलाया- राजकारणात या' ही गर्जना या नव्या राज्यकर्तींनी दिली आहे. ती बॅ.नाथ पैंच्या पठडीतील खरी सत्ताधारी बनू इच्छिते. बॅरीस्टर म्हणतात, ऋखरा सत्ताधारी कोण? जनतेच्या पायात काटा रुतला तर ज्याच्या डोळ्वयात अश्रू येतात, तो खरा सत्ताधारी.'  या महिला अशा सत्ताधारी नक्की बनणार व राजकारण नव्याने बदलणार यात शंका नाही.

प्रस्थापित व्यवस्थेतील रुढी, परंपरांची बंधने तोडून मार्ग काढतांना महिला समस्त पुरुषी व्यवस्थेला सवाल करुन पुढे मार्गक्रमण करीत आहेत. या पुरुषी मनोवृत्तीचा डाव काय आहे? या पुरुष प्रधानतेला काय हवे आहे?

***रुढी, परंपरा तुम्ही पाळा***
***रुढी, परंपरा तुम्ही पाळा,***
***फक्त स्वातंत्र्य आम्हांला द्या.***
***घराची देखभाल तुम्ही सांभाळा,***
***मालकी फक्त आम्हांला द्या.***
***मेहनत मजुरी तुम्ही करा,***
***फक्त जमीन जुमला आम्हांला द्या.***
***लेकराबाळांना वाढवा, फुलवा,***
***फक्त नांव आमचंच नाव लावू द्या.***
***कष्ट करा, मिळवा, कमवा,***
***मालमत्ता तेवढी आमच्या नावे करा.***
***चिंता तुमच्या माथी,***
***फक्त सत्ता आमच्या हाती.***
***मताचा अधिकार जरुर मिळवा,***
***फक्त राज्य आम्हांलाच करु द्या.***
***ग्रामसभा भरवा, ग्रामसभा गाजवा,***
***फक्त पंचायतीचं बजेटआम्हाला ठरवू द्या.***
***बंधन, चिंता, काबाडकष्ट हे सारं तुम्हाला घ्या,***
***स्वातंत्र्य, स्वामित्व, सत्ता, स्वायत्तता***
***एवढंच फक्त आम्हाला द्या.***

लांब पल्ल्याच्या संघर्षामधून हे सर्व डाव उधळण्यासाठी महिलांनी राजकारणात आलेच पाहिजे.

# कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण कायदा, २००५

**हा कायदा हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण करतो.तसेच पुरुषांच्या विरोधात नसून मानवतावाद, कायदा, नैतिकता आणि न्याय यांच्याशी विसंगत वर्तन करणाऱ्या व्यक्तींविरोधात आहे. या कायद्याचे स्वरूप धर्मनिरपेक्ष आहे.**

| कौटुंबिक हिंसाचार म्हणजे काय? | |
|---|---|
| शारीरिक छळ | मारणे, चावणे, लाथाडणे, ठोसे मारणे, ढकलणे, शारीरिक अत्याचार इत्यादी. |
| शाब्दिक किंवा भावनिक छळ | अपमानास्पद उपहासात्मक बोलणे, नावे ठेवणे, नोकरीस प्रतिबंध इत्यादी. |
| आर्थिक छळ | घरगुती गरजांसाठी पैसे, भाडे, हातखर्च इत्यादी न देणे, पगार, उत्पन्न जबरदस्तीने घेणे इत्यादी. |
| लैंगिक छळ | जबरदस्तीने संभोग करणे, अश्लील चित्रफीत दाखवणे, बाल लैंगिक शोषण करणे इत्यादी. |

| कौटुंबिक हिंसाचार कायद्यांतर्गत स्त्रियांना मिळणारे आदेश | |
|---|---|
| कलम १४ | अन्वये संयुक्त समुपदेशन/समझोते या कायद्याच्या अंतगर्त उपलब्ध आहेत. |
| कलम १८ | अन्वये संरक्षण आदेश कोणत्याही प्रकारची घरगुती हिंसा न करणे कामाच्या ठिकाणी प्रवेश न करणे, संपत्ती न विकणे. |
| कलम १९ | अन्वये निवासाचा आदेश स्त्रियांना घराबाहेर काढणे किंवा त्यांना घरात राहण्यास अडथळा आणणे. |
| कलम २० | अन्वये पोटगीचा आथिर्क आदेश राहणीमानाच्या दृष्टीने पुरेशी उचित, योग्य व वाजवी आथिर्क लाभाची रक्कम. |
| कलम २१ | मुलांच्या ताब्याचा आदेश. |
| कलम २२ | अन्वये नुकसान भरपाई आदेश. व्यथित व्यक्तीला झालेली ईजा,मानसिक छळ व भावनिक क्लेश यासाठी नुकसान भरपाई. |

# जीवनाचे महादान



**अवयवदानाविषयी जनजागृती करण्यासाठी सामाजिक संघटना, सरकार आपल्यापरीने सर्वतोपरी प्रयत्न करत आहेत, पण, गरज आहे ती एका देशव्यापी मोहिमेची. लाखो हात एकत्र आले तर मोठी चळवळ उभी राहू शकते, आणि लाखो लोकांना आपण नवजीवन देऊ शकतो.**


## टीम माय मेडिकल मंत्रा


ममरावे परी कीर्तिरूपी उरावेफही मराठीतील म्हण आपल्या सर्वांनाच माहिती आहे, पण, आता ममरावे परी अवयवरूपी उरावे असे म्हणणे ही काळाजी गरज बनली आहे. याचे प्रमुख कारण म्हणजे, देशात अवयव प्रत्यारोपणाच्या प्रतीक्षेत वर्षानुवर्षे खितपत पडणाऱ्यांची वाढती संख्या. अवयवदानाच्या प्रतीक्षेत असलेल्यांची यादी दिवसेंदिवस वाढत आहे, मात्र अवयवदात्यांची संख्या मात्र फार कमी आहे.

अवयवांची मागणी आणि त्या तुलनेत देशात होणारे अवयवदान यांच्यातील दरी खूप मोठी आहे. ही दरी भरून काढायची असेल 'अवयवदान' हा शब्द प्रत्येकाच्या डोक्यात भिनला गेला पाहिजे. घराघरांत अवयवदानाचे महत्त्व पोहोचले पाहिजे. खासकरून, युवा पिढीच्या मनावर अवयवदानचे महत्त्व बिंबवले गेले पाहिजे. प्रत्येक कुटुंबात अवयवदान या विषयावर चर्चा सुरू झाली पाहिजे, लोकांनी यावर आपले मत मांडले पाहिजे, यासाठी गरज आहे, ती एका देशव्यापी मोहिमेची.

एका ब्रेन डेड (मेंदू मृत) व्यक्तीच्या अवयवदानाने आठ जणांचा जीव वाचू शकतो. अवयवदान हे महादान आहे. सर्वश्रेष्ठ दान आहे असे म्हटले तरी वावगे ठरणार नाही, कारण अवयवदान केल्याने आपण आठ व्यक्तींना नवजीवन देऊ शकतो. अवयवदानाबाबत लोकांमध्ये असणाऱ्या गैरसमजामुळे लोक अवयवदान करण्यासाठी पुढे येत नाहीत. आपल्या जवळच्या व्यक्तीच्या अवयवांची मेल्यानंतर राख होण्यापेक्षा, ते अवयव एखाद्या गरजू व्यक्तीच्या कामी आले तर त्यांचा जीव आपण वाचवू शकतो. एखाद्याचा जीव वाचवण्यापेक्षा मोठे कार्य काही असूच शकत नाही, हे लोकांना पटवून दिले पाहिजे. लोकांच्या मनातील अवयवदानाबाबतचे गैरसमज दूर करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर समाज प्रबोधन होणे गरजेचे आहे.

| देशातील अवयवदानाची सद्यस्थिती | | |
|---|---|---|
| **अवयव** | **गरज** | **उपलब्ध अवयव** |
| मूत्रपिंड | २,००,००० | ८००० |
| यकृत | ५०,००० | १,५०० |
| हृदय | ३०,००० | २०० |
| कॉर्निया | १,००,००० | २५,००० |





केंद्रीय आरोग्य राज्यमंत्री अनुप्रिया पटेल यांनी भारतात अवयवांची गरज आणि अवयवदान यांच्यात खूप मोठी दरी असल्याचं संसदेत मान्य केले आहे. केंद्र सरकारच्या माहितीनुसार भारतात, दहा लाख लोकांमागे फक्त ०.५८ टक्के अवयवदान करतात. केंद्र आणि राज्य सरकारकडून अवयवदानाचे महत्त्व तळागाळापर्यंत पोहोचवण्यासाठी विविध मार्गांनी प्रबोधन केले जाते. जनजागृतीसाठी कार्यक्रम आयोजित केले जातात. पण, ही मोहीम फक्त काही दिवसांची न राहता वर्षभर सुरू असली पाहिजे.


अवयवदानाची ही चळवळ प्रत्येकाच्या अंगात भिनली पाहिजे, यासाठी माय मेडिकल मंत्राने २०१७ मध्ये SaveAaradhya ही मोहीम सुरू केली. चार वर्षांची आराध्या, या मोहिमेचा चेहरा बनली. आराध्याच्या माध्यमातून अवयवदानाची मोहीम घराघरात नेण्याचा प्रयत्न केला. यासाठी सोशल मीडियाचा प्रभावीपणे वापर करण्यात आला.

८ एप्रिलला ट्विटर आणि फेसबुकच्या माध्यमातून ही मोहीम देशभरात पोहोचवण्यात आली.SaveAaradhya हा ट्रेंड फक्त मुंबई-पुण्यात नाही तर देशपातळीवर सुरू झाला. तब्बल २० हजारांपेक्षा जास्त लोकांनी या मोहिमेत सहभाग घेतला. सोशल मीडियाचा प्रभावी वापर एवढ्या मोठ्या प्रमाणावर जनजागृती बहुधा पहिल्यांदाच केला गेला असावा. सोशल मीडियावर प्रश्न उपस्थित केले जात असतीलही, पण चांगल्या पद्धतीने याचा वापर केल्यास एक मोठी चळवळ उभी राहू शकते, हे माय मेडिकल मंत्राने दाखवून दिलं.

अखेर माय मेडिकल मंत्राच्या मोहिमेला यश आले. गुजरातच्या सोमनाथचं हृदय आराध्यासाठी दान करण्यात आले. आराध्याची प्रतीक्षा संपली. आराध्यावर यशस्वी हृदय प्रत्यारोपण शस्त्रक्रिया करण्यात आली. एक मोहीम यशस्वी झाली असली तरी अजून देशभरात लाखो आराध्या आहेत ज्यांना अवयवांची गरज आहे. त्यांच्यासाठी माय मेडिकल मंत्रा अवयवदानाची मोहीम देशभरात परसवण्यासाठी अविरत काम करत राहणार आहे.

भारतात ६५ टक्के युवक आहेत, त्यामुळे भारताला तरुण देश असे म्हटले जाते. तरुणांनी अवयवदानाचे महत्त्व ओळखल्यास अवयवांच्या प्रतीक्षेत असलेल्यांची ही यादी आपल्याला कमी करता येईल. त्यासाठी तरुण पिढीने पुढाकार घेण्याची गरज आहे. या पिढीने अवयवदान या विषयावर घरात चर्चा केली पाहिजे, आणि लोकांना याचे महत्त्व पटवून देण्यासाठी पुढाकार घेतला पाहिजे.

एका माहितीनुसार, भारतात दरवर्षी पाच लाख लोकांचा अवयवांच्या प्रतीक्षेत असतानाच मृत्यू होतो. या सर्वांचे प्राण वाचवणे शक्य आहे. यासाठी आपल्यालाच पुढाकार घ्यायला हवा. सन २०१७ मध्ये राज्यात अवयवदानाची संख्या वाढली. अवयवदानात महाराष्ट्र देशभरात पहिल्या तीन क्रमांकात आहे. लोकांमध्ये अवयवदानाबाबत जनजागृती होतेय. सामाजिक संघटना, सरकार आपल्यापरीने सर्वतोपरी प्रयत्न करत आहेत, पण, गरज आहे ती एका देशव्यापी मोहिमेची. लाखो हात एकत्र आले तर मोठी चळवळ उभी राहू शकते, आणि लाखो लोकांना आपण नवजीवन देऊ शकतो.



# पोलिसांकडून मदत कशी मिळवावी...

- महिलांनी त्यांच्याविरुद्ध होत असलेल्या गुन्ह्याची तक्रार देण्यासाठी न घाबरता पोलीस ठाण्यास जावे.
- पोलीस ठाण्यात महिला अधिकारी तत्काळ दखल घेऊन तक्रार नोंदवून घेतील.
- तुमची तक्रार तुम्हाला वाचून दाखवली जाईल व फिर्यादीची एक प्रत त्वरित विनामूल्य दिली जाईल.
- विनयभंग, बलात्कार यांसारख्या गुन्ह्यांचे घटनास्थळ कोठे आहे याची काळजी करू नका. कोणत्याही पोलीस ठाण्यात जा. पोलीस तुमची तक्रार नोंदवून संबंधित पोलीस ठाण्यास त्वरित हस्तांतरित करतील.
- तुमचा जबाब नोंदवताना तुमच्यासोबत तुमची विश्वासार्ह व्यक्ती हजर राहू शकतील. तुम्ही कौटुंबिक हिंसाचाराच्या बळी असाल तर पोलीस तुमची तक्रार नोंदवून घेतील. त्याचबरोबर तुम्हाला कौटुंबिक हिंसाचार कायद्यांतर्गत जिल्हास्तरावरील महिला बाल विकास अधिकारी, या कार्यालयामार्फत सेवा उपलब्ध होऊ शकते याची माहिती देतील.
- महिला जर लैंगिक गुन्ह्याच्या बळी असेल तर महिलांच्या वतीने इतर कोणत्याही व्यक्ती पोलीस ठाण्यास येऊन तक्रार देऊ शकते.
- महिला जर पोलीस ठाण्यास जाऊ इच्छित नसेल तर पोलिसांच्या मुंबई येथील १०३ व उर्वरित महाराष्ट्रकरिता १०९१ या हेल्पलाईनवर संपर्क साधा. महिला पोलीस अधिकारी साध्या वेशात तुम्हाला सोयीस्कर ठिकाणी भेटून तुमची फिर्याद/जबाब नोंदवतील.
- महिला जर स्थानिक भाषेत बोलू शकत नसेल किंवा काही शारीरिक/मानसिक व्यंग असेल तर पोलीस दुभाष्या किंवा विशेष प्रशिक्षक बोलून त्यांच्या मदतीने तुमची फिर्याद/जबाब नोंदवून घेतील.
- महिला पोलीस ठाण्यात आल्यावर आरोपीच्या संपर्कात येणार नाही याची दक्षता पोलीस घेतील.



- पोलीस तुम्हाला गरजेनुसार वैद्यकीय उपचार/तपासणीसाठी रुग्णालयात घेऊन जातील व महिला वैद्यकीय अधिकारी यांच्याकडून तपासणी करून घेतील.
- जर तुम्हाला आश्रय/निवारा हवा असेल तर तोही मिळवून देण्यास पोलिस सहकार्य करतील.
- महिला पोलीस अधिकारी पोलीस ठाण्यामध्ये नसतील तर संध्याकाळनंतर पोलिस स्टेशनमध्ये महिलेस बोलविता येत नाही.
- महिला सायबर गुन्ह्याबाबत सायबर सेलशी संपर्क साधू शकतात.
- एखाद्या महिलेला अटक करताना महिला पोलीस व महिला साक्षीदार असतात.
- महिला त्यांच्याप्रकरणी जिल्हास्तरावर पोलिस अधीक्षक/आयुक्त कार्यालयातील महिला व मुलांकरिता सहायता कक्ष यांच्याकडे मदत मागू शकतात.
- विनयभंग, लैंगिक अत्याचार, सायबर गुन्हे अशा अत्याचारांना बळी पडलेल्या महिलांची ओळख ही गोपनीय ठेवण्यात येईल.




# महिला क्रिकेट संघाचा धडाका

**भारतीय महिला क्रिकेट संघानेही पुरुष संघाच्यापाठोपाठ दक्षिण आफ्रिकेत धडाकेबाज कामगिरी केली. एकदिवसीय सामन्यातील वर्चस्व टी-२० मालिकेतही कायम राखले. यंदाच्या मोसमात संघाची कर्णधार मिताली राज, सांगलीची स्मृती मानधना, वेदा कृष्णमूर्ती, हरमनप्रीत कौर, झुलन गोस्वामी आणि कोल्हापूरची अनुजा पाटील यांनी जागतिक क्रिकेटमध्ये भारतीय महिला संघाचा दबदबा निर्माण केला आहे.**

## अमित मधुकर डोंगरे
amitdongre10@gmail.com

२०१७ सालच्या महिला विश्वकरंडक स्पर्धेत भारतीय संघाला उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले असले तरी संघातील खेळाडू समाधानी नव्हत्या; ही सल या संघाने दक्षिण आफ्रीकेत यजमानांना कोणतीही संधी न देता धडाकेबाज खेळ करून वर्चस्व राखत दूर केली. असेच सातत्य आता मायदेशात होणाऱ्या ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या मालिकेत दाखवावे लागेल. शिवाय यजमान भारत, ऑस्ट्रेलिया आणि इंग्लंड या तीन संघात टी-२० लढतींची तिरंगी मालिका होणार आहे.

भारतीय महिला संघ दक्षिण आफ्रिकेत दाखल झाला तेव्हा यशाची खात्री कोणीच देत नव्हते, कारण पुरुष संघ काय आणि महिला संघ काय मायदेशातच सरस कामगिरी करतात आणि परदेशात माती खातात अशी टीका सातत्याने होत असते. याच पार्श्वभूमीवर भारताच्या पुरुष संघाला कसोटी मालिकेत पराभव पत्करावा लागल्यानंतर तर जहरी टीका सुरू झाली. त्यात महिला संघाच्या कामगिरीकडेही लक्ष लागले. त्याचवेळी पुरुष संघाने एकदिवसीय मालिकेत कात टाकली व यजमानांना

// स्त्रीशक्तितुल्या सदा //

त्यांच्याच भूमीवर पराभूत करण्याचा विक्रम केला. त्यातूनच प्रेरणा घेत महिला संघानेही एकदिवसीय मालिकेत यजमानांना २-१ असे पराभूत करत इतिहास रचला. परदेशात भारताने इतका सातत्यपूर्ण खेळ यापूर्वी कधीच केलेला नाही. महिला संघातील एकेका खेळाडूची कामगिरी पाहिली तरी आश्चर्य वाटते की इतक्या दुर्लक्षानंतर आता कुठे त्यांना सोयी- सुविधा मिळू लागल्या आहेत आणि या महिला खेळाडू मैदानावर अफलातून कामगिरी करत भारतीय क्रिकेट नियामक मंडळाचा (बीसीसीआय) विश्वास सार्थ ठरवत आहेत.

### पहिल्याच सामन्यापासून वर्चस्व

तीन एकदिवसीय सामन्यांच्या मालिकेत भारताच्या महिला संघाने पहिल्याच सामन्यापासून वर्चस्व दाखवले. पहिलाच सामना ८८ धावांनी जिंकताना महिला संघाची कर्णधार मिताली राज, महाराष्ट्राची स्मृती मानधना यांनी अफलातून फलंदाजी केली तर झुलन गोस्वामी आणि शिखा पांडे यांनी गोलंदाजीत चमक दाखवली. यजमानांसमोर दोनशेपेक्षा जास्त धावा करण्याचे आव्हान असताना त्यांना केवळ सव्वाशे धावा करता आल्या.

दुसऱ्या सामन्यात तर महाराष्ट्राच्या स्मृती मानधनाने कमाल केली. पहिल्या सामन्यात तिला शतकाने हुकावणी दिली हाती या सामन्यात मात्र तिने तडाखेबाज शतक फटकावले. हरमनप्रीत कौर आणि वेदा कृष्णमूर्ती यांनीही अर्धशतके झळकावत भारताला त्रिशतकी धावसंख्या गाठून दिली हे आव्हान यजमान संघाला पेलवलेच नाही. झुलन गोस्वामी आणि पूनम यादव यांनी पुन्हा एकदा अप्रतिम गोलंदाजी केली आणि यजमानांचा डाव केवळ १२४ धावांत उखडून टाकत १७८ धावांनी विजय मिळवत मालिका जिंकली.

तिसऱ्या सामन्यात मात्र भारताला पराभवाचा सामना करावा लागला व व्हाईट वॉश ची संधी हुकली. या सामन्यात दीप्ती शर्मा आणि वेदा कृष्णमूर्तीने अर्धशतकी खेळी केली मात्र मिताली आणि मानधना अपयशी ठरल्या. यजमानांकडून मेगन प्रीज व लॉरा वॉलवर्डने अर्धशतकी खेळी करत हा सामना सात गडी राखून जिंकला व प्रतिष्ठा राखली.

### टी-२० तही प्रभाव

पहिल्या सामन्यात अनुजा पाटीलने महाराष्ट्राची शान वाढवताना अचूक गोलंदाजी केली व यजमानांना १६४ धावांत रोखले. त्यानंतर मिताली नाबाद ५४, मानधना २८, जेमिका रॉड्रिग्ज ३७ आणि वेदा कृष्णमूर्ती ३७ यांनी या धावांचा सहज पाठलाग केला व भारताला पहिली टी-२० लढत सात गडी राखून जिंकून दिली. येथूनच भारताच्या संघात महाराष्ट्राच्या खेळाडूंचे वर्चस्व आणखी वाढले.

दुसऱ्या सामन्यात दक्षिण आफ्रीकेच्या १४४ धावांचा यशस्वी पाठलाग करताना मिताली नाबाद ७६ आणि मानधना ५७ यांनी भक्कम पाया रचला आणि भारताला ९ गडी राखून विजय मिळवून दिला. याही सामन्यात महाराष्ट्राचा अनुजा पाटीलने पुन्हा एकदा अचुक गोलंदाजी करत आपली निवड सार्थ ठरवली.

तिसऱ्या सामन्यात मिताली, वेदा कृष्णमूर्ती अपयशी ठरल्या मात्र मानधनाने हरमनप्रीतच्या साथीत प्रयत्नांची शिकस्त केली. मात्र संघाला केवळ १३३ धावाच करता आल्या ज्या यजमानांनी ५ गडयांच्या मोदल्यात सहज पार केल्या व विजय मिळवला. चौथा साम ना पावसाने पंधरा षटकानंतर रद्द झाला. पाचव्या सामन्यांत भारतीय संघाने यजमानांसमोर १७५ धावांचे लक्ष्य ठेवले होते मात्र भारतीयांच्या गोलंदाजीसमोर दक्षिण आफ्रिकेच्या फलंदाज साफ अपयशी ठरल्या व महिला संघाने ही मालिका ३-१ अशी जिंकली.

### मानधनाची दमदार एन्ट्री



भारतीय महिला क्रिकेट संघाची प्रमुख खेळाडू स्मृती मानधना हिने आगामी २०२१ मध्ये होणारी महिलांची विश्वकरंडक क्रिकेट स्पर्धा भारतच जिंकणार, असा दुर्दम्य आशावाद व्यक्त केला. मूळची सांगलीची म्हणजेच आपल्या महाराष्ट्राची नवोदित दलंदाज, स्मृती मानधना आता भारतीय महिला क्रिकेटचे विश्व गाजवत आहे. महिला विश्वकरंडक विश्व स्पर्धेत, अंतिम लढतीत, भारतीय संघाला, उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले असले तरी, आगामी २०२१ सालची स्पर्धा मात्र, भारतीय संघच जिंकेल, असा सकारात्मक विश्वास तिने व्यक्त केला. आता नुकत्याच पार पडलेल्या दक्षिण आफिकेविरुद्धच्या मालिकेत भारतीय संघाच्या विजयात स्मृतीच्या फलंदाजीचा मोठा वाटा आहे. तिच्या रूपाने भारतीय संघात महाराष्ट्राच्या खेळाडूंना महत्त्व मिळत आहे, हे महत्त्वाचे.

### अनुजा पाटीलची चमक



कोल्हापूरचे नाव घेतले की लगेच समोर येतो तो रांगडा कुस्तीचा खेळ, पण आपल्या क्रिकेटच्या आवडीने थेट भारताच्या महिला अ संघाच्या कर्णधरपदी नियुक्ती झालेल्या मराठमोळ्या अनुजा पाटील हिने या शहरात वेगळाच पायंडा पाडला. आता याच मातीतून महाराष्ट्रालाच नव्हे तर देशाला अनुजाकडून प्रेरणा घेत अनेक मुली क्रिकेटमध्ये कारकीर्द घडविण्यासाठी सज्ज होतील.

१९९२ साली कोल्हापुरात कुस्तीच्या वातावरणात जन्मलेली अनुजा क्रिकेटकडे कशी वळली याचे सर्व शहराला कौतुक वाटत आहे. तिचे वडील सॉ मिलमधून निवृत्त झाले आहेत तर काका कोल्हापूर सकाळमध्ये सेवेत आहेत. घरातून तिच्या कारकिर्दीला पूर्ण पाठिंबा आहे. तवनाप्पा पाटणे हायस्कूलमध्ये शिकत असतना तिने भोसले सरांकडे क्रिकेटचे धडे गिरवायला सुरुवात केली. त्यानंतर अनिल सांगावकर यांच्याकडे आता ती सराव करते. वयाच्या अकराव्या वर्षी बॅट हातात घेतलेली अनुजा धडाकेबाज फलंदाज तर आहेच शिवाय उत्तम ऑफ स्पिन गोलंदाजीही करते. याच अचूक गोलंदाजीने तिने दक्षिण आफ्रिकेतही कमाल केली. स्मृती आणि अनुजा यांच्या पावलावर पाऊल ठेवत व त्यांच्याकडून प्रेरणा घेत महाराष्ट्राच्या आणखी काही खेळाडू भविष्यात भारतीय संघाकडून खेळतील असा विश्वास वाटतो.



## महिलांमधील तेंडुलकर

मिताली राज हे नाव भारतीयच नव्हे तर जागतिक क्रिकेटला अजिबात नवे नाही. महिला संघाची कर्णधार अशी जरी तिची आज ओळख असली तर अफाट मेहनतीने व सातत्यपूर्ण कामगिरीच्या जोरावर हे यश मिळवले आहे. पुरुष किंवा महिला गटात सलग दोन वेळा विश्वकरंडक स्पर्धेत कर्णधारपद भूषवणारी ती एकमेव खेळाडू आहे. २००५ आणि २०१७ साली तिने हा मान मिळवला. सध्या ती भारतीय रेल्वमध्ये नोकरी करते मात्र स्वतःची अकादमीही चालवते. तिच्या कारकिर्दीवर लवकरच एक चित्रपट येत आहे.

वयाच्या दहाव्या वर्षी बॅट हातात घेत क्रिकेटचे धडे गिरवायला लागल्यावर लगेचच सातच वर्षात तिची स्थानिक पातळीवरील कामगिरी पाहून राष्ट्रीय संघात निवड झाली. सलग सात अर्धशतके फटकावण्याचा तिचा विक्रम आजही अबाधित आहे. महिला क्रिकेटम धील तेंडुलकर असे तिला संबोधले जाते ते तिच्या धडाकेबाज खेळाम ुळे व शांत स्वभावामुळे. कसोटीत तिने एकमेव शतक इंग्लंडविरुद्ध फटकावले असले तरी ते द्विशतक आहे हे खूप महत्त्वाचे. खरेतर महिलांच्या संघाला २०१० पर्यंत जास्त कसोटी सामने खेळायलाच मिळाले नाहीत अन्यथा तिची आकडेवारी आणखी बहरली असती. एकदिवसीय सामन्यांत भारताकडून सर्वाधिक धावांचा विक्रम आजही तिच्याच नावावर आहे. सहा शतके आणि नऊ अर्धशतकांच्या मदतीने तिने ६,२५९ धावा फटकावल्या आहेत. आज जरी तिने वयाची पस्तिशी गाठलेली असली तरी २०२१ साली होणारी विश्वकरंडक स्पर्धा खेळण्यासाठी ती प्रचंड आशावादी आहे.

पुरुषांच्या सामन्यांवेळी समालोचक म्हणूनही ती कार्यरत असते. एकूणच सचिन तेंडुलकरप्रमाणे क्रिकेट हेच तिचे आयुष्य आहे. जागतिक क्रिकेटमध्ये मिताली राज हे नाव आज अत्यंत आदराने घेतले जाते ही वस्तुस्थिती आहे. हरमनप्रीत कौर, स्मृती मानधना, अनुजा पाटील, वेदा कृष्णमूर्ती, पूनम यादव या खेळाडू तिच्याकडूनच प्रेरणा घेत या खेळामध्ये धडे गिरवत तिच्याच नेतृत्वाखाली आज खेळत आहेत. आणखीही काही खेळाडू भविष्यात मिताली राज होण्याचे स्वप्न घेवून येतील आणि यशस्वीही होतील.




## चखदा एक्सप्रेस झुलन गोस्वामी

महिला क्रिकेटमध्ये भारताचीच नव्हे तर जागतिक पातळीवर सर्वाधिक बळी घेणारी गोलंदाज म्हणून झुलान गोस्वामीचे नाव घेतले जाते. अत्यंत अचूक गोलंदाज आणि जमलेली जोडी लीलया फोडणारी गोलंदाज असाही तिचा गौरव केला जातो. इंग्लंडविरुद्ध २००२ साली आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये पदार्पण करणाऱ्या झुलनने पुढे पहिल्याच इंग्लंड दौऱ्यावर कमाल केली. २००६-०७ साली तिने गोलंदाजीच्या जोरावर इंग्लिश संघाची धूळदाण उडवली. पहिल्याच कसोटीत दोन्ही डावात प्रत्येकी पाच असे एकूण दहा गडी बाद करत आपला दर्जाही सिद्ध केला आणि निवडही सार्थ ठरवली.

काहीशी अबोल आणि एकलकोंडी राहणारी झुलन मैदानावर मात्र आक्रमक असते. एकदिवसीय सामन्यात तिने सर्वाधिक दोनशे गडी बाद केले आहेत. कसोटीत चाळीस तर टी-२० सामन्यांत बळींचे अर्धशतक पूर्ण केले आहे. नुकत्याच पार पडलेल्या दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या मालिकेतही तिने केलेल्या कामगिरीमुळेच भारताला मालिका जिंकता आली. तिच्याही कारकिर्दीवर एक चित्रपट येत आहे. मला वाटते अर्जुन आणि पद्मश्री पुरस्कार मिळवणाऱ्या मिताली आणि झुलन यांच्यावरील चित्रपट निश्चितच प्रेरणादायी ठरतील आणि येत्या काळात भारतीय महिला क्रिकेट संघाचा जागतिक क्रिकेटवर दबदबा निर्माण होईल.

**(लेखक मुक्त क्रीडा पत्रकार आहेत.)**

# आयोगाची घटना, अधिकार व कर्तव्ये

भारताच्या राज्य घटनेचे कलम १४,१५ व १६ अन्वये स्त्रियांच्या संबंधात हमी देण्यात आलेले मूलभूत हक्क मिळवून देण्यास चालना देण्याच्या उद्देशाने आणि स्त्रियांचा समाजातील दर्जा व प्रतिष्ठा सुधारण्याकरिता, विशेषतः राज्य घटनेच्या कलम ३८,३९, ३९–ब, ४२–ब मध्ये अंतर्भूत केलेली राज्याच्या धोरणाची निर्देशक तत्त्वे अमलात आणण्यासाठी, स्त्रियांची अप्रतिष्ठा करणाऱ्या प्रथांच्या बाबतीत अन्वेषण करून योग्य त्या सुधारणात्मक उपाययोजना करण्यासाठी किंवा सुचविण्यासाठी, स्त्रियांवर परिणाम करणाऱ्या कायद्याचे परिणामकारकरित्या संनियंत्रण व अंमलबजावणी करण्यासाठी व स्त्रियांचा समाजातील दर्जा व प्रतिष्ठा सुधारणे वा उंचावणे या गोष्टींशी संबंधित असलेल्या सर्व बाबींवर शासनाला सल्ला देण्यासाठी व त्याच्याशी संबंधित किंवा तद्नुषंगिक बाबींसाठी राष्ट्रीय महिला आयोगाच्या धर्तीवर महाराष्ट्र राज्यात महाराष्ट्र राज्य महिला आयोगाची स्थापना १९९३ साली करण्यात आली.

## आयोगाची प्रमुख उद्दिष्ट्ये

- समाजात महिलांचे स्थान आणि प्रतिष्ठा उंचावणे
- महिलांबाबत होत असलेला अन्याय शोधून काढणे आणि तो दूर करण्यासाठी उपाय सुचविणे
- राज्य घटना व अन्य कायदे या नुसार महिलांसाठी तरतूद करण्यात आलेल्या संरक्षक उपाययोजनांसंबंधीच्या सर्व बाबींचे अन्वेषण व तपासणी करणे
- त्या संरक्षण उपाययोजनांच्या अंमलबजावणीसंबंधीचे अहवाल दरसाल किंवा आयोगास योग्य वाटेल अशा अन्य वेळी राज्य शासनास सादर करणे
- स्त्रियांची स्थिती सुधारण्यासाठी राज्याला त्या संरक्षक उपाययोजनांची अधिक परिणामकारकपणे अंमलबजावणी करता यावी, यासाठी अशा अहवालांमध्ये शिफारशी करणे
- संविधान व इतर कायदे यांच्या, स्त्रियांना बाधक होणाऱ्या विद्यमान तरतुदींचा वेळोवळी आढावा घेणे आणि अशा कायद्यांमधील कोणत्याही उणिवा, अपूर्णता किंवा दोष दूर करण्यासाठी त्या कायद्यांमध्ये सुधारात्मक वैधानिक उपाययोजनांबाबतच्या सुधारणांची शिफारस करणे
- समाजात महिलांचे स्थान आणि प्रतिष्ठा उंचावण्यासाठी राज्य सरकारला योग्य सल्ला देणे

## आयोगाचे अधिकार

- महाराष्ट्र राज्य महिला आयोग ही वैधानिक संस्था आहे
- आयोगाला खटल्याची न्यायचौकशी करणाऱ्या दिवाणी न्यायालयाचे सर्व अधिकार असतील
- राज्याच्या कोणत्याही भागातील कोणत्याही व्यक्तीस हजर राहण्यासाठी फर्मावणे व हजर राहण्यास भाग पाडणे आणि शपथेवर तिची तपासणी करणे
- कोणतेही दस्तऐवज शोधून काढण्यास व ते सादर करण्यास फर्मावणे
- शपथपत्रावरील साक्षी, पुरावे स्वीकारणे
- कोणत्याही न्यायालयाकडून किंवा कार्यालयातून कोणताही सार्वजनिक अभिलेख किंवा त्याची प्रत मागवणे
- साक्षीदारांच्या किंवा दस्तऐवजांच्या तपासणीसाठी राजादेश काढणे
- महिलांशी संबंधित प्रकरणांमध्ये एखादा राज्य सरकारी वा केंद्र सरकारी अधिकाऱ्याची चौकशी अधिकारी म्हणून नियुक्ती करण्याचाही अधिकार आयोगाला आहे.

## आयोगाचे उपक्रम

- महिलांना मोफत कायदेविषयक सेवा पुरविणे
- महिलांच्या प्रश्नांबाबत संशोधन करणे
- महिलांविषयक बाबींवर कार्यशाळा, शिबिर आणि प्रशिक्षण आयोजित करणे
- समाजात लिंगसमानता प्रस्थापित करण्यासाठी विशेष प्रयत्न करणे
- सर्व संबंधित घटकांसाठी जनजागृती मोहीम राबविणे
- कायदेविषयक साक्षरता मोहीम राबविणे
- स्वयंसेवी संस्थांच्या सहकार्याने उपक्रम राबविणे
- राज्यातील कारागृहांची तपासणी करणे
- बालसुधारगृहे आणि महिलांसाठीच्या संस्थांची तपासणी करणे
- महिलांसाठी विविध शिबिरे आयोजित करणे
- समुपदेशन सुविधा उपलब्ध करून देणे
- आयोगासमोर सुनावणी घेणे
- जनसुनावणी घेणे
- सरकारला महिलांविषयक धोरणांसाठी शिफारशी करणे



रौप्य महोत्सवी
वर्ष २०१८

// स्त्रीशक्तिरतुल्या सदा //

# महाराष्ट्र राज्य महिला आयोग, मुंबई


गृहनिर्माण भवन म्हाडा बिल्डिंग,
कलानगर, वांद्रे (पू.), मुंबई ४०००५१
दूरध्वनी : ०२२ – २६५९०८७८

mscwmahilaayog@gmail.com
www.mscw.org.in
Maharashtra Rajya Mahila Ayog (@mahascw)
Maharashtra women commission (@mscw_bandra)
Tejaswini App

chairperson.mscw@gmai.com
www.vijayarahatkar.co.in
@vijaya.rahatkar
@VijayaRahatkar
vijayarahatkar.wordpress.com